ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

सप्टेंबर २०१२ • मूल्य १०

## कलानगरीतील वाटचाल

**डॉ. माधवी मेहेंदळे**




## हिंसाचारामध्ये पोलिस जखमी का होतात?

**सुरेश खोपडे**




**'अस्मितादर्श'मधील** निवडक वैचारिक लेखन, कथा, कविता
यांचे बबन लोंढे आणि सुधाकर गायकवाड यांनी केलेले संकलन-संपादन


वामनदादा कर्डक
यांचे चरित्र





**आंबेडकरी विचारधारा**
बबन लोंढे
सुधाकर गायकवाड
मूल्य ६०० रुपये
सवलतीत ३६० रुपये

**निर्णायक युद्धानंतर...**
बबन लोंढे
सुधाकर गायकवाड
मूल्य १२५ रुपये
सवलतीत ७५ रुपये







**काळोखगर्भ**
बबन लोंढे
सुधाकर गायकवाड
मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये




**एका कवीचे जीवनगाणे**
बबन लोंढे
मूल्य १६० रुपये
सवलतीत १०० रुपये

ग्रंथाली — द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ दूरध्वनी : २४३०६६२४ • granthali01@gmail.com




मूल्य १२० रु. सवलतीत ७५ रु.

# जैन हिल्सवरील जागरण

**भवरलाल जैन**

जळगावचे उद्योगपती भवरलाल जैन यांची 'रॅग्ज टु रिचेस' कथा सर्वपरिचित आहे, परंतु त्यांना अनुभवाच्या ओघात जे शहाणपण आले ते त्यांच्या वेळोवेळच्या भाषणा-मुलाखतींमधून व्यक्त होते. ते परंपराधिष्ठित तर आहेच, पण काळाला अनुरूपही आहे. त्यामुळे समाजाच्या आजच्या बिकट आणि विकल स्थितीत जैन यांचे प्रतिपादन मोलाचे ठरते. त्याची महती अधिक प्रतीत होते ती त्यामधून येणाऱ्या प्रभावी सूत्रवाक्यांनी. विचारसरणीच्या अभावाच्या सद्यकाळात त्या सूत्रवाक्यांना तत्त्वविचाराचा मोठेपणा लाभतो...

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**सप्टेंबर २०१२, वर्ष ३१ वे,**
**अंक नववा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.

लंडन इथे झालेल्या पॅरा आलिंपिकमध्ये उंच उडीत भारताला रौप्यपदक मिळालं. त्याचं विशेष कौतुक वाटावं अशी ही घटना आहे. कर्नाटकच्या गिरिशा होसनागरा नागराजेगौडा या अपंग मुलाची जिद्द त्यात आहे. सध्या पोलिसी मनोधैर्याबद्दल जी चर्चा चालते आहे त्या पार्श्वभूमीवर या एकांड्या शिलेदाराच्या ध्यासाला सलाम करायला हवा.

प्रसाद घाडी हा असाच एक अतिविकलांग मुलगा. जो आपल्या उण्यापुऱ्या एकवीस वर्षांच्या आयुष्यात एक दंतकथा बनला. कोपरापुढे होणारी हातांची मंद हालचाल आणि कुशाग्र बुद्धिमत्ता एवढीच त्याच्या शारीरिक जमेची बाजू. याच्या जोरावर तो राष्ट्रीय पातळीवर 'बालश्री' ठरला. त्याच्या संगोपनात त्याची आई शरयू आणि वडील नागेश यांनी जी सकारात्मक वृत्ती जोपासली आणि प्रसादमध्ये पेरली त्याची प्रांजळ कहाणी 'पंखाविना भरारी' या पुस्तकातून तीन वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाली. प्रसाद म्हणजे भारताचा स्टिफन हॉकिंग आहे असा गौरव ज्येष्ठ संपादक कुमार केतकर यांनी केला होता. या पुस्तकाची दोन वर्षांत दहावी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे! 'ग्रंथाली'ने समाजाला आपल्यातील अपूर्णत्वाची जाणीव करून देणाऱ्या या व अशा पुस्तकांची निर्मिती करून विचारप्रवृत्त करणारे लेखनही ग्रथित केले आहे.

पोलिसांचे मनोधैर्य खचते कसे यावर प्रकाश टाकणारा लेख या अंकात निवृत्त आयपीएस अधिकारी सुरेश खोपडे यांनी लिहिला आहे. ज्यातून मोटिव्हेशन मिळेल अशी व्यवस्थाच नसल्याचे दिसते.

याउलट, आत्मप्रेरणेने बालसंगोपनाचे कार्य करणाऱ्या, 'सीएनएन हिरोज्'मध्ये समाविष्ट झालेल्या नेपाळच्या पुष्पा बस्नेतबद्दल अपर्णा पाटील लिहीत आहेत. 'थिंक महाराष्ट्र'च्या माध्यमातून अशा व्यक्तींची ओळख दर महिन्याला होतच असते. याचबरोबर सांस्कृतिक जगाचे दर्शन डॉ. माधवी मेहेंदळे यांनी घडवले आहे. यातूनच नव्या ऊर्मींना वाट मिळेल. आमचा तोच प्रयत्न असतो.

**– कार्यकारी संपादक**

# हिंसाचारामध्ये पोलिस जखमी का होतात?

**सुरेश खोपडे** (आय.पी.एस. निवृत्त)

ब्रिटिशांनी मुंबई शहरात भंडारी मिलीशियांची स्थापना करून भारतात पोलिसदलाची मुहूर्तमेढ १६७० साली रोवली. ते निमलष्करी स्वरूपाचे दल गस्त घालण्याचे महत्त्वाचे काम करी. त्यानंतर प्रभावी पोलिसयंत्रणा निर्माण करण्यासाठी त्यांनी अनेक राज्यांत वेगवेगळे प्रयोग केले आणि भारत सोडताना एक सुसज्ज, सुसंघटित व प्रभावी पोलिसदल भारतीयांच्या हवाली केले.

पूर्वीच्या काळी पाटील हा गावाचा प्रमुख असे. त्याला मदत करण्यासाठी कोतवाल, रामोशी यांच्यासारखे इतर नोकर असायचे. पाटलाला न्यायाधीशाप्रमाणे लहानसहान गुन्ह्यांत शिक्षा करण्याचा अधिकार असे. पूर्वी पोलिसदलाच्या देखरेखीचे काम जमीनदाराचे असे. कॉर्नव्हॉलिस या गव्हर्नरने ते काम जमीनदारांकडून काढून घेऊन, आता अस्तित्वात असलेल्या, पोलिस स्टेशनचा पाया घातला. त्याने दर वीस ते तीस मैलांवर एक पोलिस ठाणे निर्माण केले. त्यावर एक दरोगा असे. निवाडा करण्याचे आणि शिक्षा देण्याचे खेड्यातील पोलिसयंत्रणेचे अधिकार रद्द केले.

सध्या अस्तित्वात असलेली पोलिस व्यवस्थापन पद्धत ही सिंध प्रांतातील प्रयोगावर बेतलेली आहे. चोरांपासून मोठ्या गावांचे संरक्षण करण्याचे आणि शांतता-सुव्यवस्था राखण्याचे काम कोतवाल करत असे. एखादा कोतवाल व्यक्तिश: चांगला असेल तर जनतेला चांगल्या प्रकारचे प्रशासन मिळे, पण एखादा कोतवाल महत्त्वाकांक्षी, आत्मकेंद्री, जुलुमी असेल तर जनतेच्या दु:खाला पारावार राहत नसे. कोतवालांना अमर्याद सत्ता असल्याने व त्यांच्यावर प्रशासनाचे म्हणावे तेवढे नियंत्रण नसल्याने, ते शांतता राखण्यासाठी रानटीपणे वागत असते. अनेक वेळा प्रजेवर जुलूम करत असत. पूर्वीच्या काळातील पोलिस अंमलदारांचा भर लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याकडे असे. एखाद्या गावात पोलिस अंमलदारावर हल्ला झाला अगर त्याचा अपमान झाला, अगर वाजवी अगर गैरवाजवी हुकूम मानला नाही तर सर्व पोलिस स्टेशन त्या गावावर धावून जाई. हुकूम न मानणाऱ्यांची गावात धिंड काढली जाई. काही बाबतींत सर्व गावाला बेदम चोप देत, क्वचित गावाला पेटवून देत, अशा नोंदी अनेक अभ्यासकांनी करून ठेवलेल्या आहेत. म्हणूनच की काय, अजूनही बऱ्याच आया आपल्या खोडकर मुलांना युनिफॉर्ममधल्या पोलिसाकडे बोट दाखवून भीती घालताना दिसतात. त्याच पोलिसांच्या उत्तराधिकाऱ्यावर ११ ऑगस्ट रोजी आझाद मैदानावर हल्ला झाला.

आसाम आणि म्यॅनमार येथील दंगलींच्या संदर्भात आझाद मैदान येथे आयोजित केलेल्या मेळाव्याच्या वेळी जो हिंसाचार झाला त्याचा निषेध करून अपराध्यांना जरब बसवली पाहिजे, यात शंका नाही. घडलेल्या घटनेबद्दल आयोजकांना दोष द्यायचा की शासनाला याबद्दल बरीच चर्चा चालू आहे. अशा प्रकारच्या या आयोजनात सामान्य जमावाचे रूपांतर दंगल, जाळपोळ करणाऱ्या हिंसक जमावात होईल अशी जाणीव कार्यक्रमाच्या आयोजकांना असावी किंवा तसा त्यांचा हेतू असावा असे मानण्यास फार थोडा वाव आहे. म्हणून या कार्यक्रमाला परवानगी देण्यापासून, घडणाऱ्या घटना टाळण्यासाठी करायच्या पूर्वप्रतिबंधात्मक व तात्कालिक व्यूहरचना करण्याच्या कारवाईमध्ये प्रशासन कमी पडले हे मान्य करावे लागेल. त्यामुळे पोलिस आयुक्त पटनायक यांची झालेली बदली समर्थनीय आहे.

या सगळ्या गदारोळामध्ये राजकीय नेतृत्वाला दोष द्यायचा की पोलिस नेतृत्वाला, याबाबत जरूर चर्चा होऊ शकते. अशा कार्यक्रमांना परवानगी देण्याचे काम राजकीय नेते करीत नाहीत. पोलिसनेत्यांनी परवानगी नाकारल्यानंतर संयोजक राजकीय नेतृत्वाकडे जातात, मग असे राजकीय नेते परवानगी देण्याबद्दल पोलिस नेतृत्वावर दबाव आणू शकतात हे खरे आहे. परंतु राजकीय नेत्यांचा दबाव किती मानायचा आणि किती मानायचा नाही याची जाणीव पोलिस नेतृत्वाला असते. कार्यक्रमामुळे घडणाऱ्या हिंसाचाराचे वस्तुनिष्ठ आणि साधार गांभीर्य राजकीय नेत्यांसमोर मांडले तर कोणताही राजकीय नेता प्रशासनावर दबाव आणताना दहा वेळा विचार करतो. म्हणून परवानगी देण्याची खरी जबाबदारी पोलिस नेतृत्वावर पडते. पोलिस नेतृत्वाने अशी परवानगी का दिली असावी याला तीन कारणे असू शकतात. आयोजकांनी सांगितल्याप्रमाणे १००० ते १५०० लोक येतील यावर पोलिस आयुक्तांनी विश्वास

ठेवला. दुसरा मुद्दा म्हणजे, जमलेले लोक हिंसक होऊ शकणार नाहीत अशी त्यांची खात्री पटली असावी. तिसरा मुद्दा म्हणजे, जमाव हिंसक झाला तरी आपण बळाचा वापर करून आंदोलकांना धडा शिकवू असा आपल्या ताकदीचा वृथा अभिमान वाटला असावा. या तिन्ही बाबींमध्ये पोलिस नेतृत्व कुचकामी ठरलेले दिसते.

बंदोबस्तासाठी नेमलेल्या महिला पोलिसांचा दिवसाढवळ्या जाहीर विनयभंग करण्यात आला. ही मुंबई पोलिसदलाचे नेतृत्वास काळिमा फासणारी घटना आहे. जिथे आपल्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या महिला सहकाऱ्यांचे पोलिस आयुक्त संरक्षण करू शकत नाही तिथे सामान्य महिलेची अब्रू कशी राखणार हा महत्त्वाचा प्रश्न उभा राहिलेला आहे. या घटनेमुळे पोलिसदलाच्या मनोधैर्यावर विपरीत परिणाम होऊन पोलिस आणि अल्पसंख्याक यांच्यामधील कटुता वाढेल. किती लोक मैदानावर जमतील याचा अंदाज पोलिसांना आला नाही. कारण पोलिसांची गुप्तहेरयंत्रणा प्रचंड कमकुवत आहे. माहिती पुरवणारी सामान्य जनता आणि पोलिस यांचा संबंध पूर्णपणे तुटलेला आहे. तसेच पोलिस आणि अल्पसंख्याक यांच्यामधील संवाद पूर्णपणे बंद आहे. त्यामुळे संपूर्ण पोलिसदलाबद्दल तरुणांच्या मनामध्ये असलेला गैरसमज आणि त्यातून निर्माण झालेला आकस आणि द्वेष कमी करण्याचा कोणताही प्रयत्न पोलिस आयुक्तांकडून केला गेल्याचे दिसत नाही. पोलिसांच्या गाड्या जाळण्याबरोबरच आणि पोलिसांना एकटेदुकटे गाठून त्यांना मारहाण करण्याबद्दल जमावाची मजल जाते, याचा अर्थ पोलिसदल सक्षम नसून ते विस्कळीत आहे आणि आपण त्यांच्यावर सहज कुरघोडी करू शकतो असा समज सामान्य जनतेमध्ये झालेला दिसतो. पोलिस नेतृत्वाने आपल्या कर्मचाऱ्यांचे आणि अधिकाऱ्यांचे सबलीकरण न करता खच्चीकरणच केलेले आहे. पोलिसदलाचे मनोधैर्य खच्ची करण्याची प्रक्रिया फार पूर्वीपासून चालू आहे.

११ ऑगस्ट रोजी आझाद मैदान येथील हिंसाचारात पोलिस कर्मचाऱ्यांवर हल्ले झाले. महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग करण्यात आला. यातील बहुतेकजण मुंबई पोलिसांच्या 'एल ए' (लोकल आर्म) विभागात नेमणूक झालेले होते.

पोलिसदलात महिला पोलिस शिपायांची संख्या लक्षणीय वाढलेली आहे. मुंबई पोलिसदलात भरती झालेल्या कर्मचाऱ्यांपैकी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त तरुण ग्रामीण भागातून आलेले असतात. पोलिस ही मर्दानी नोकरी असून आपण काहीतरी भव्यदिव्य करू, अशी अपेक्षा बाळगून भरती झालेले तरुण-तरुणी नायगाव पोलिस हेडक्वार्टरला रुजू होतात. २००७ साली, प्राथमिक ट्रेनिंग पूर्ण करून आलेल्यांची आम्ही पाहणी केली असता त्यांच्यापैकी अनेकजण उच्च पदवीधर, पदवीधर, कॉलेजात जाणारे, तांत्रिक पात्रता असलेले होते. बहुतेकजण संगणक जाणणारे होते. प्रशिक्षण घेऊन आलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना अतिशय गुंतागुंतीच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक समस्या हाताळाव्या लागतात. नवरा-बायकोच्या भांडणापासून देशविघातक कृत्य करणाऱ्या दहशतवाद्यापर्यंतच्या प्रश्नांशी त्यांचा संबंध येतो. त्या सर्व समस्या हाताळण्यासाठी त्यांच्याकडे पात्रता व आयुधे कोणती? नऊ महिन्यांचे प्रशिक्षण व हातात दीड हात लांबीची लाठी! प्रशिक्षणातील निम्मा वेळ 'दहिने मूड', 'बाये मूड' करत दंडाचे व पायांचे स्नायू बळकट करण्यात व निम्मा वेळ कायद्याच्या कलमांची घोकमपट्टी करण्यामध्ये जातो. प्राथमिक ट्रेनिंग करून आल्यानंतर त्यांची कमीत कमी ५ वर्षे सलग नेमणूक 'एल ए' (लोकल आर्म) विभागात होते. त्यात एक विभाग प्रशिक्षण, आर्म ॲम्युनिशन सांभाळणे, दुसरा विभाग कैद्यांना तुरुंगामधून कोर्टासमोर उभे करणे, तिसरा विभाग कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत करणे, चौथा विभाग वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या घरी ऑर्डरली म्हणून काम करणे अशी कार्ये करतात.



'एल ए' (लोकल आर्म) विभागात असताना, चौकात अगर मोबाईल व्हॅनवर सलग बारा-बारा तास बसणे याशिवाय ते कुठलीच कामगिरी पार पाडत नाहीत. लोकसेवा आयोगातर्फे निवडलेला एखादा अधिकार ट्रेनिंग पूर्ण करून आला तर त्याला क्षेत्रीय अनुभव यावा म्हणून फिल्डवर पाठवतात. पण पोलिस शिपायाला मात्र 'एल ए' विभागात सलग ५ वर्षे डांबून त्याच्या सर्व क्षमतांचा नाश करण्यात येतो. कायद्याचा वापर करणे, अर्ज घेणे, चौकशी करणे, जनसंपर्क साधने वापरणे यांपैकी कोणतेच काम करण्याची संधी त्यांना मिळत नाही. लिहिणे, वाचणे, ज्ञानाचा वापर करणे, शहाणपण शिकणे यांपैकी एकही गोष्ट करण्याची त्यांना संधी मिळत नाही. शारीरिक क्षमता वापरात येते, पण बौद्धिक, भावनिक व आध्यात्मिक क्षमता वापरली जात नाही. त्यामुळे नोकरीच्या काळात कोणाचाही दलामध्ये विकास (growth) होत नाही. तुरुंग ते कोर्ट अशी गुन्हेगाराची वाहतूक करताना काही निढावलेले गुन्हेगार नवशिक्षित जवानांवर वाईट संस्कार करतात. काही वरिष्ठ अधिकारी आर्डरलीकडून मानहानीकारक कामे करवून घेतात. अल्पावधीतच त्यांचा पोलिस खात्याबद्दल भ्रमनिरास होतो. आशा, आकांक्षा, प्रेरणा, जीवनात काहीतरी करून दाखवण्याची ऊर्मी, जनतेला मदत करण्याची वृत्ती हे सर्व संपून जाते.

इतर अनेक कारणांमुळे बदनाम झालेल्या काही अधिकाऱ्यांची नेमणूक 'एल ए' विभागात होते. अशा अधिकाऱ्याच्या हाताखाली अनेक वर्षे काम करावे लागल्याने नवप्रविष्ठ कर्मचाऱ्यांत निराशावाद निर्माण

होतो. नोकरीच्या सुरुवातीचा ‘एल ए’ विभागातील उमेदीचा पाच वर्षापेक्षा जास्त काळ संपवल्यावर ते पोलिस स्टेशनला जेव्हा जातात तेव्हा ते सांगकाम्या पद्धतीने काम करणे अशी एक कार्यसंस्कृती घेऊन जातात. त्यामुळे मुंबई पोलिसांपैकी पंधरा टक्के लोकांना इतर लिखाण राहू द्या, पण स्वत:च्या रजेचा अर्जदेखील लिहिता येत नाही. पन्नास हजारांचे हे दल निष्क्रिय, प्रेरणाहीन, हडेलहप्पी व सांगकाम्या पद्धतीने काम करते. त्यामुळे मानवीबळाचा प्रचंड अपव्यय होतो. हा अपव्यय टाळून ‘एल ए’ विभाग प्रभावी आणि परिणामकारक बनवण्याचे काम ज्याच्या हातामध्ये पोलिसदलाचे सुकाणू असते ते पोलिस आयुक्त करू शकतात, पण त्यांच्याकडे तशी दूरदृष्टी, कौशल्य आणि इच्छाशक्ती नाही. अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रचंड अधिकार व नोकरीची सुरक्षितता असते, पण त्याचा वापर आहे तीच कालबाह्य व्यवस्था कायम ठेवणे, स्वत:चे करिअर, वेस्टेड इंटरेस्ट व अहंकाराची काळजी घेणे यांसाठी केला जातो. राज्य राखीव पोलिसदलाच्या तीस कंपन्या कायम मुंबईमध्ये तळ ठोकून असतात. पॅरामिलिटरीच्या तुकड्या कायम सज्ज असतात. त्यांच्याच जीवावर पोलिस आयुक्त मुंबईतील कायदा-सुव्यवस्था हाताळत असतो.


आपली नोकरी जाऊ नये एवढेच शहाणपण मिळवत पोलिस कर्मचारी शहरी झगमगाटाकडे कधी असूयेने तर कधी तिरस्काराने पाहात पोलिस लाईनमध्ये टिपिकल ग्रामीण जीवन, अलिप्तपणे जगत, एक दिवस निवृत्त होतात. बाजारहाट, मुलांचे संगोपन हे अर्धांगिनी पाहते. नोकरीच्या काळात यांचा जनसंपर्क नसतो. मुंबईतून निवृत्त होऊन गावी गेलेले अंमलदार धूर्त व कुटिल गावकऱ्यांच्या दृष्टीने बुजरे व अव्यवहारी राहतात. आपल्यानंतर आपला मुलगा खात्यात लागल्यावर आपली सरकारी खोली पुढे मुलाच्या नावावर करता येणार असल्याने त्यांना स्वर्गप्राप्तीपेक्षा मोठा आनंद मिळतो.

‘एल ए’ विभाग ही ग्रामीण भागातून आलेल्या, खरे भारतीय मूल्य मानणाऱ्या उत्साही, ध्येयवादी तरुण-तरुणींचे हडेलहप्पी, ध्येयशून्य, दिशाहीन, संकुचित, सांगकाम्या, असुरक्षित अशा पोलिस शिपायांत रूपांतर करण्याची प्रमुख संस्था आहे व त्याला येणारा प्रत्येक पोलिस आयुक्त जबाबदार आहे.


अकरावी उत्तीर्ण झाल्यानंतर माझ्या वर्गमित्रांपैकी दोघेजण पुण्यातील एका मोठ्या कंपनीत, एकजण टर्नर व दुसरा फिटर म्हणून कामास लागले. दोघेजण पोलिस शिपाई म्हणून भरती झाले. कार्यप्रेरणेचा अभ्यास सुरू केल्यावर मी या चौघांशी सविस्तरपणे व सातत्याने बोलत असे. मल्टिनॅशनल कंपनीत काम करणारे मित्र आपल्या कंपनीबद्दल आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांबद्दल मोठ्या आदराने बोलत. आमची कंपनी, आमचे साहेब असे उद्गार त्यांच्या बोलण्यात येत. पोलिसदलातील मित्र ना पोलिसदलाबद्दल चांगले बोलत, ना वरिष्ठ अधिकाऱ्यांबद्दल. मोठ्या कंपनीतील मित्रांना निव्वळ बसून पगार मिळत नसे. खूप घाम गाळावा लागे. पोलिसदलातील मित्रांना पगार, इतर फायदे व सोयी मिळत. मग हा फरक का? कारण मोठ्या कंपनीतील व्यवस्थापन आधुनिक शास्त्रीय पद्धतीवर आधारलेले असून पोलिसदलातील व्यवस्थापन नावीन्याचा अभाव असल्याने पूर्णपणे कालबाह्य ठरलेले आहे.

**- सुरेश खोपडे**
(आयपीएस निवृत्त)
भ्रमणध्वनी ९८७०३२३९००
khopade.suresh@gmail.com

**‘डायरी’ आणि ‘नोंदी डायरीनंतरच्या’ या दोन पुस्तकांचा समावेश संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पत्रकारिता अभ्यासक्रमात...**




**दिवस असे की...**
**मूल्य २२५ रु.**
**सवलतीत १३५ रु.**




**नोंदी डायरीनंतरच्या**
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

# फुलपाखरांच्या घरात...

## अपर्णा पाटील

सीएनएन ही बातम्या देणारी जगातली सगळ्यात विश्वासार्ह वृत्तसंस्था. या वृत्तसंस्थेच्या माध्यमातून एक विशेष उपक्रम राबवला जातो. ज्याचं नाव आहे सीएनएन हिरोज. यात दरवर्षी जगभरात सामाजिक उद्धाराचं कार्य हाती घेतलेल्या, एकाकी झुंज देणाऱ्या व्यक्तीच्या कामाची दखल घेतली जाते. ज्याची माहिती त्यांच्या वाहिनीवरून आणि वेबसाइटच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवली जाते. जगभरातल्या अनेकांच्या कामांची महिती घेऊन त्यांना मानांकनं दिली जातात. लोकांनी, वाचकांनी ही माहिती, त्यांचं कार्य आणि त्यांच्या दुर्दम्य अशा इच्छाशक्ती पाहून त्यांना मत द्यायचं असतं. त्यातून दरवर्षी दहा व्यक्तींची 'सीएनएन हिरो' म्हणून निवड होत असते.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, अडीअडचणींवर मात करत समाजातल्या विशिष्ट घटकाला आधार देण्याचं, त्यांच्या उपयोगी पडण्याचं काम करणारी माणसं जगभरातल्या कानाकोपऱ्यात अक्षरशः शोधून काढली जातात. त्यांचा समावेश सीएनएन हिरोजच्या मानांकनांमध्ये केला जातो. त्यांच्या अनमोल कार्याचा परिचय लोकांना करून दिला जातो. त्यांनी केलेल्या कामाविषयी वाचून आपल्याला थक्क व्हायला होतं. यंदाच्या 'सीएनएन हिरो'ची यादी नुकतीच जाहीर झाली आहे. त्यांच्या वेबसाइटवर त्याची माहिती आपल्याला मिळू शकते. सहज म्हणून यंदाच्या यादीत निवडले गेलेले सीएनएन हिरो कोण होते, याची माहिती वाचताना पुष्पा असं नाव दिसलं. पुष्पा या



**पुष्पा बस्नेतला रोज सकाळी उठण्यासाठी घड्याळाला आलार्म लावायची गरज भासत नाही. कारण रोज सकाळी तिला उठवण्यासाठी चाळीस मुलांचे आवाज पुरेसे असतात. ही सगळीच्या सगळी चाळीस मुलं तिच्या दोन मजली घरात तिच्याबरोबर राहतात. या मुलांचं आईपण स्वीकारलेल्या पुष्पाभोवती बागडणारी मुलं म्हणजे फुलाभोवती उडणारी फुलपाखरंच.**

नावामुळे ही कोणी भारतीय महिला आहे की काय, या विचारानं, उत्सुकतेनं तिच्या माहितीचा गुगलवर सर्च घेतला. आपल्या सिंधुताई सपकाळांशी नातं सांगणारी ही पुष्पा बस्नेत ही आपल्या शेजारच्या नेपाळची एक असमान्य तरुणी असल्याचं समजलं. पुष्पा बस्नेत नावाच्या या महिलेची त्यातली माहिती वाचून आणि मुलाखती ऐकून एक वेगळीच कहाणी हाती लागली.

अभ्यासात आपल्याला फारशी गती नाही म्हणून सोशल वर्कच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेणारी पुष्पा एक साधीसुधी मुलगी. पण याच मुलीनं नेपाळमधल्या अनेक मुलांचं मातृत्व स्वीकारलं. तिच्या या कार्याचा गौरव म्हणून तिला यंदाचा सीएनएन हिरोज हा पुरस्कार लोकांच्या मान्यतेनं मिळाला. सिंधुताईंचं काम मोठं आहे. तर पुष्पानं आता कुठे सुरुवात केली आहे. भारतासारख्या देशात सिंधुताईंनी अनेक मुलांचं मातृत्व स्वीकारलं तेव्हा त्यांनाही अनेक महाकाय अडचणी आल्या होत्या. पुष्पाच्या आयुष्यात वैयक्तिक अडचणी फार नाही आल्या, पण सामाजिक, आर्थिक अडचणींचे डोंगर पार करत ही खडतर सुरुवात पुष्पानं केली आहे.

पुष्पा बस्नेतला रोज सकाळी उठण्यासाठी घड्याळाला आलार्म लावायची गरज भासत नाही. कारण रोज सकाळी तिला उठवण्यासाठी चाळीस मुलांचे आवाज पुरेसे असतात. ही सगळीच्या सगळी चाळीस मुलं तिच्या दोन मजली घरात तिच्याबरोबर राहतात. या सगळ्या मुलांना सकाळी शाळेत जाण्यासाठी तयार करण्याचं काम पुष्पाच करते. ते करताना ती जणू एखादी कुटुंबप्रमुख असल्यासारखी वावरत असते. पण तिची कहाणी काही औरच असते, हे तिचं आयुष्य समजून घेतल्याशिवाय समजणार नाही. तिच्या घरात राहणारी ही सगळी मुलं कधीतरी तुरुगांत राहत होती आणि २८ वर्षांच्या पुष्पानं या सगळ्या मुलांना घर दिलंय. तुरुंगाच्या बंदिस्त जागेतून बाहेर काढून त्यांना मोकळ्या हवेत



श्वास घ्यायला शिकवलंय.

नेपाळ हा जगातल्या गरीब देशांपैकी एक. युनिसेफच्या आकडेवारीनुसार इथली ५५ टक्के जनता आंतरराष्ट्रीय दारिद्र्यरेषेखाली जगणारी आहेत. परिणामी, पाश्चिमात्य जगाच्या तुलनेत अनेक सोयीसुविधांचा अभाव इथं आहे. गरिबीमुळे उद्भवणाऱ्या अनेक समस्या त्यांच्या पाचवीला पुजलेल्या आहेत. सरकारचाही या सुविधा पुरवण्याच्या प्रयत्न अपयशी ठरत असल्याचं चित्र आहे. शिवाय, राजकीय अस्थिरतेचं कारण अनेक सुधारणांच्या प्रकल्पांना आणि प्रयत्नांना खीळ घालत आहेत. अशामुळे सामाजिक सुरक्षेचा लवलेशही या देशातल्या जनतेला नाही. अशा गरिबीत जगणं अनेक गुन्ह्यांना जन्म देणारं ठरलं आहे. गुन्हेगारी आणि गुन्हेगारांशी संबंधित समस्यांना कसं हाताळावं याचं भान जरी असलं तरी अंमलबजावणीच्या पातळीवरचं चित्र भयावह आहे.

नेपाळमध्ये गुन्हेगारांच्या संबंधित असलेल्या कायद्यामुळेही काही समस्या आहेत. यात एखाद्याच्या हातून गुन्हा घडला तर त्याच्या कुटुंबाची अपरिहार्यपणे फरफट होते. एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला आणि त्याला पोलिसांनी पकडलं तर त्याला तात्पुरती कोठडी दिली जाते. गुन्हा सिद्ध झाला तर तुरुंगात रवानगी. पण अशा परिस्थितीत त्यांच्या अल्पवयीन मुलांना स्थानिक पालकांकडे सोपवण्याखेरीज गत्यंतर नसतं. पण जर अशी व्यक्ती किंवा कुटुंब नसेल तर त्या मुलाची त्याच्या आई किंवा वडिलांबरोबर थेट तुरुंगात रवानगी केली जाते किंवा सरळ रस्त्यावर सोडून दिलं जातं. आपल्या पालकांबरोबर राहणारी अनेक मुलं सध्या नेपाळमधल्या तुरुंगात आहेत. त्या सगळ्यांना आपल्या हक्काचं घर मिळावं यासाठी पुष्पाचा प्रवास सुरू झाला.

'केवळ त्यांच्या आई किंवा वडिलांनी गुन्हा केला म्हणून त्या मुलांनाही तुरुंगात पाठवणं हे अन्यायकारकच आहे. कारण त्यांनी तर कोणताच गुन्हा केलेला नाही, त्यामुळेच अशा मुलांना तुरुंगाबाहेर मुक्त वातावरणात जगण्याची संधी दिली पाहिजे, हेच माझं ध्येय आहे', असं पुष्पा सांगते. शिवाय अशा मुलांना त्यांच्या आईवडिलांकडून त्रास होण्याची भीती जास्त असते. जर एखादा खरंच गुन्हेगारवृत्तीचा असेल, तर त्याच्या मुलांना त्यांच्या विकृतीचा सामना करावा लागतो. कित्येकदा लहान मुलांवर त्यांचे पालकच अत्याचार करतात. कधी चुकीमुळे किंवा त्यांनी न केलेल्या अपराधांमुळे तुरुंगात राहण्याची वेळ आली असेल तर त्याचा राग किंवा चीड ही लहान-लहान मुलांसाठी आयुष्यभराचा घाव करणारी ठरते. त्यामुळे पालकांबरोबर मुलंही तुरुंगात राहत असतील, तर त्यात चिंता करण्याचं कारण आहे असं वाटून जाऊ शकतं. ही मोठी सामाजिक समस्या असल्याचं पुष्पानं अगदी कोवळ्या वयात जाणलं आणि तिच्या आयुष्यानं एक वेगळंच वळण घेतलं.

नेपाळमधल्या या अजब न्यायाला पुष्पानं पहिल्यांदाच बदलण्याचा प्रयत्न केला. खरं तर तिच्या या कामाची सुरुवात झाली तेव्हा तिलाही आपण फार काही मोठी गोष्ट करतोय असं वाटत नव्हतं. परंतु आज तिच्या या कामामुळे चाळीस-पन्नास मुलांच्या चेहऱ्यावर हास्य उमललं आहे.

नेपाळमधल्या तुरुंगातल्या मुलांना मुक्त जीवन जगण्याची संधी देण्याच्या प्रयत्नात असलेले अनेक सेवाभावी गट तिथं आहेत. २००५ पासून पुष्पानं अशा शंभरहून अधिक मुलांना पालकांच्या मायेनं जगण्याचं संधी दिलीय. दहा वर्षांखालील मुलांना डे-केअर सेवा आणि त्यापेक्षा मोठ्या मुलांना निवासाची व्यवस्था केली आहे. यात मुलांचं जेवणखाण, शाळा, दवाखाना अशा सगळ्याच गोष्टींचा खर्च तिनं स्वतःवर घेतला आहे. तेही केवळ या मुलांना इतर मुलांसारखं सर्वसामान्य जीवन जगता यावं म्हणून.

'मी स्वतःला सुदैवी मानते, ते मला चांगलं शिक्षण मिळालं म्हणून आणि तेच आयुष्य इतरांना देतेय इतकंच', असं ती आपल्याविषयी सांगते. पुष्पा २१ वर्षांची असतानाच आपल्या आयुष्याचं ध्येय काय हे समजून चुकली. एका उद्योजकाच्या घरी तिचा जन्म झाला आणि तिनं कॉलेजमध्ये

सोशल वर्क हा विषय निवडला. फिल्ड स्टडी म्हणून तिला कालमती पोलिस स्टेशनमधल्या कोठडीत ठेवलेल्या महिला कैद्यांकडे पाठवण्यात आलं होतं. त्यावेळी कोठडीतल्या काही महिलांबरोबर त्यांची छोटी-छोटी मुलंही होती. कोणताही गुन्हा न केलेल्या आणि हसण्याबागडण्याच्या वयातल्या या मुलांना कैदेत ठेवल्याचं पाहून तिला धक्का बसला.

त्या छोट्या मुलांना पाहून पुष्पा अस्वस्थ झाली होती. पण तेव्हा ती शिकत होती, स्वतःच विद्यार्थीनी होती. आपण आता फार काही करू शकणार नाही अशी जाणीव तिला होती. कदाचित याचमुळे तिच्या मनात कुठेतरी या मुलांसाठी काही करायला हवं याची खूणगाठ बांधली गेली असावी.

कालमती पोलिस ठाण्यातल्या कोठडीत घडलेला एक प्रसंग तिच्यासाठी मोलाचा ठरला होता. ती जेव्हा अभ्यासक्रमाचा भाग म्हणून त्या कोठडीत गेली तेव्हा काही मुलं तिथं होती. आठ महिन्यांची सानुकची नावाची चिमुकलीही तिथं होती. ती तिथं जाताच सानुकचीने तिची शाल हातात धरली आणि तिच्याकडे पाहून छानसं स्मितहास्य केलं. ती गोष्ट तिच्या काळजाचा ठाव घेणारी होती.

तिनं घरी जाऊन आपल्या आईवडिलांना, या मुलांसाठी काही करायला हवं, हे सांगितलं. ते म्हणाले, तू काही दिवसांत ही गोष्ट विसरून जाशील. पण तसं झालं नाही. अशातच कॉलेज बंक करण्याची शिक्षा म्हणून तिला कॉलेजमधून काढून टाकण्यात आलं. अशावेळी मनाशी जे ठरवलं होतं, तेच करण्याच्या दृष्टीनं तिनं पहिलं पाऊल टाकलं.

या मुलांना हक्काचं आणि सुरक्षित घर असावं असं तिला ठामपणे वाटायला एक कारणही होतं. अभ्यासक्रमाचा भाग म्हणून तुरुंगाला भेट देताना एक भयंकर केस तिनं ऐकली होती. गुन्हेगार असलेल्या एका व्यक्तीला कोठडीत ठेवलं होतं. त्यावेळी त्यांची मुलगी बाहेर कोणताही आसरा नसल्यानं त्याच्याबरोबर राहत होती. या गुन्हेगारी वृत्तीच्या माणसानं आपल्या पोटच्या गोळ्यालाच आपल्या वासनेची शिकार बनवलं होतं. ते ऐकणं हे पुष्पासाठी भयंकरच होतं.

काही दिवसांनी या मुलांसाठी डे-केअर सुरू करण्याचं ठरवलं तेव्हा तिच्याकडे ना नोकरी होती ना पैसा. आधी तिला विरोध करणाऱ्या तिच्या पालकांनी नंतर मदत करायचं ठरवलं. अनेक महिला कैद्यांना ही इतकी तरुण मुलगी आपल्या मुलांना नीट सांभाळेल ना, याची शंका वाटत राही. तिलाच काय कोणालाही तिच्याविषयी खात्री नव्हती. सगळेच जण तिला वेड्यात काढत होते. पण तिच्या काही मित्रमैत्रिणींनी तिला आर्थिक मदत केली. अगदी तिच्या स्वतःच्या घरात नवीन वस्तू घेतल्यानंतर जुन्या वस्तूंची रवानगी तिच्या मुलांच्या संगोपन केंद्राकडे व्हायला लागली. तिच्या केंद्रात पहिलं बाळ आलं तेच मुळी आठ महिन्यांचं. त्यामुळे आपल्या केंद्रात त्याला लागणाऱ्या सगळया वस्तू असायला हव्यात, असा हट्टच पुष्पाने धरला. तिच्या घरच्यांनी आणि मित्रपरिवारानं तो पुरवलाही.

पहिल्या दोन महिन्यांत तिच्याकडे पाच मुलं आली होती. रोज सकाळी ती तरुंगातून मुलांना केंद्रात आणायची आणि दुपारी नेऊन सोडायची.काठमांडूमध्ये अशा प्रकारचा उपक्रम राबवणारी ती पहिलीच होती. दोन वर्षांनी तिनं 'बटरफ्लाय होम' सुरू केलं, जिथं आता ती आणि तिच्याबरोबर मुलं राहतात. ही सगळी मुलं तिला आई म्हणूनच हाक मारतात. या मुलांसाठी अजून काय करता येता येईल याचाच विचार ती दिवसरात्र करत असते आणि ही मुलं मला जगण्याची ऊर्जा देतात, असं म्हणत ही चाळीस मुलांची माता छोटाशा गरीब देशात आपुलकीची बाग फुलवत जातेय.

पुष्पाच्या घरात आईवडील, मोठा भाऊ आणि बहीण असे सदस्य होते. खरं तर शाळेपासून सर्वसामान्य विद्यार्थी असलेली पुष्पा स्वप्न मात्र पायलट होण्याचं पाहायची. अभ्यासात फार गती नव्हती, त्यामुळे जेव्हा महत्त्वाच्या एसएलसी परीक्षेत नापास झाल्यावर तर आपण आपला वेगळा मार्ग निवडावा, हेच बरं, असा विचार तिनं केला. सोपा विषय कोणता तर सोशल वर्क, असा विचार करून तिनं काठमांडू विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सेंट झेविअर्स कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. विषय सोपा एवढंच नाही तर आठवडयातून तीन दिवस कॉलेज, दोन दिवस फिल्ड व्हिजिट्स असा अभ्यासक्रम होता. आता फिल्ड व्हिजट, गणितातल्या आकडेमोडीएवढ्या कठीण नक्कीच नसतात, असाच साधा सरळसोट विचार करून तिनं सोशल वर्कला पसंती दिली होती. शिवाय, आपल्या कमी उंचीमुळे आपल्या पायलट होऊन आकाशात भराऱ्या मारणं अजिबात शक्य नाही, याची एव्हाना तिला जाणीव झाली होती.

घरच्यांना मात्र ती उद्योजक होईल अशी अपेक्षा होती. त्यामुळेच कॉलेज बंक केल्यानं काढून टाकलं गेलं तेव्हा मुलांसाठी काहीतरी करणार हे सांगताच वडीलही नाराज झाले होते. आता 'सीएनएन हिरो' ठरलेल्या पुष्पाच्या वडिलांची नाराजी केव्हाच मावळली.

शालेय शिक्षणात फारशी गती नसलेली आणि एका उबदार कुटुंबातल्या पुष्पानं वेगळा मार्ग चोखाळला तो, मुलांना शिक्षणाचा मूलभूत हक्क मिळावा किंवा त्यांना हक्काचं घरं मिळवून देण्याचा. तरुण असलेल्या पुष्पाला येता-जाता लोक लग्नाविषयी विचारतात. त्यावर ती म्हणते, 'लग्न झालं की मी, माझं घर, माझा नवरा-मुलं अशा स्वार्थी आणि चौकटीत मी अडकून जाईन. त्यापेक्षा यापेक्षा जास्त मुलांची आई होणं जास्त चांगलं नाही का?' तिचं उत्तर ऐकलं की आपल्याच खुजेपणा जाणीव आपल्या डाचत राहते.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

# उत्तम शेती...

## प्रशांत मोरे

'उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी' असे आपण परंपरेने म्हणत असलो तरी प्रत्यक्षात परिस्थिती विपरीत आहे. दिवसेंदिवस अधिकाधिक लहरी होत जाणारे हवामान, वाढता उत्पादनखर्च, मजुरांची वानवा आणि या सर्व दिव्यांतून कसेबसे पीक हाती आले तरी किमान मुद्दल वसूल होईल, इतकाही बाजारभाव मिळण्याची शाश्वती नाही. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने निरनिराळ्या क्षेत्रांत देदीप्यमान कामगिरी केली. मात्र देशातील बहुसंख्यांच्या उपजीविकेचे साधन असणाऱ्या शेतीत मात्र आपल्याला फारशी प्रगती साधता आलेली नाही. महात्मा गांधीजींनी स्वयंपूर्ण जीवनशैलीसाठी 'खेड्यांकडे चला' असा संदेश दिला. झाले प्रत्यक्षात उलटच. खेड्यातील शिक्षित-अर्धशिक्षित आणि अशिक्षित तरुणांचे लोंढे शहरात येऊ लागले. मिळालेल्या मजुरीवर राबू लागले आणि कधी काळी संपन्न असणारी गावठाणे शहराकडून येणाऱ्या मनिऑर्डरची वाट पाहू लागली. कोकणात हे चित्र फार मोठ्या प्रमाणात दिसू लागले. 'जय जवान- जय किसान' ही आपल्या देशाची घोषणा. त्यात शेतकऱ्याला देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकाचा दर्जा दिलेला आहे. अगदी सुरुवातीपासूनच्या पंचवार्षिक योजनांपासून शेती विषयाला खूप महत्त्व दिलेले दिसून येते; तरीही 'सुजलाम- सुफलाम' अशी ही भूमी मोठ्या प्रमाणात पडीक का राहू लागली? सुशिक्षितांचे एकवेळ सोडा, पण अर्ध अथवा अशिक्षितांनाही शेती करण्यापेक्षा रिक्षाचालक अथवा तत्सम व्यवसाय पत्करणे चांगले, असे का वाटू लागले?

या साऱ्या प्रश्नांची खरीखुरी उत्तरे शोधण्याचा प्रयत्न आता काहीजण करू लागले आहेत. एका दाण्यापासून तीन-चार महिन्यांत शंभरपट अधिक दाणे निर्माण करणाऱ्या शेतीशिवाय दुसरा कोणताही उद्योग अधिक फायदेशीर असूच शकत नाही. शेती करण्याची पद्धत, त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलल्याने ही परिस्थिती उद्‌भवल्याचे निष्कर्ष आता पुढे येऊ लागले आहेत.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यात, बदलापूरजवळील बेंडशीळ गावात, राजीव भट यांनी गेली दोन दशके तेथील पाच-सहा एकर जागेत शेती ही उत्तमच असल्याचे दाखवून दिले आहे. राजीव भटांना गिर्यारोहणाची आवड. त्यामुळे निरनिराळ्या प्रदेशांतील डोंगरदऱ्यांमध्ये त्यांनी मनसोक्त भटकंती केली. तरुणपणी रानावनात फिरताना काहीतरी ठोस मूलभूत स्वरूपाचे काम करावे, असे त्यांना वाटत होते. त्यातूनच मग जगभरातील मानवी संस्कृतीचा पाया असणाऱ्या शेतीविषयात लक्ष घालण्याचा निर्णय त्यांनी घेतला. पुण्यातील वडिलोपार्जित जागा विकून मिळालेल्या पैशांतून भट कुटुंबीयांनी बेंडशीळ येथे पाच एकर जागा घेतली. २० वर्षांपूर्वी भट कुटुंबीय जेव्हा या ठिकाणी आले तेव्हा ही जागा म्हणजे उघडे माळरान होती. जमीन वरकस आणि जरा सावलीला उभे राहता येईल असे एकही झाड नव्हते. राजीव भट यांनी अक्षरशः शून्यातून इथे हिरवी सृष्टी साकारण्याचे स्वप्न पाहिले आणि अत्यंत परिश्रमपूर्वक ते सत्यात उतरवूनही दाखवले. परंपरागत तरीही शास्त्रीय बैठक असणाऱ्या मशागतीतून भट यांनी नवल वाटावे इतकी छान हिरवाई जोपासली आहे. तांदुळापासून तिळापर्यंत आणि हळदीपासून मोहरीपर्यंत लागणारी अनेक पिके आणि आंतरपिके या वरकस जमिनीत राजीव भट यांनी यशस्वीरीत्या घेऊन दाखवली. २६ जुलै २००५ च्या अतिवृष्टीने त्यांची ही हिरवी मैफल अक्षरशः उद्ध्वस्त करून टाकली. मात्र राजीव भट यांनी हार मानली नाही. त्यांनी जिद्दीने आणि मेहनतीने पुन्हा नव्याने डाव मांडला. विशेष म्हणजे 'हल्ली रासायनिक खतं वापरल्याशिवाय झाडाचं पानही हालत नाही' असा सार्वजनिक असमज असण्याच्या जमान्यात त्यांनी शंभर टक्के सेंद्रीय खतावर पाच एकर जागेत हिरवा स्वर्ग साकारला. सेंद्रीय खतसुद्धा ते बाहेरून विकत आणत नाहीत. झाडावर पिकून खाली पडणारा पालापाचोळा, काटक्या आणि गांडुळांनी त्यांना कधीही वेगळ्या खताची आवश्यकता भासू दिली नाही.

राजीव भट याबाबत जंगलाचे उदाहरण देतात. तिथे झाडांचा पालापाचोळा खाली पडतो. तिथेच कुजतो. पानांच्या आच्छादनामुळे पावसाळ्यात जमिनीची धूप थांबते. जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण वाढते. परिणामी, भूजलसाठा वाढतो. पाने कुजून खत तयार होते. त्या ओलसर दमट जागेत मग नवे बीजे सहजपणे अंकुरतात. या नैसर्गिक प्रक्रियेत आपण बाधा आणतो. झाडांखालचा पालापाचोळा गोळा करतो. त्यामुळे जमीन उघडी पडते. ती लवकर तापते.

राजीव भट हा सिद्धांत केवळ तार्किक कसोट्यांवर सांगत नाहीत, तर त्यांच्या बागेत उदाहरणाने या प्रयोगाचे फलित दाखवून देतात. त्यांच्या बागेत दोन मोठ्या आणि एक लहान अशा तीन कूपनलिका आहेत. आवारात अशा रीतीने पावसाचे पाणी जिरत असल्याने या तिन्ही कूपनलिकांत मुबलक पाणी असते. त्यांच्या या बागेलगतच एक लहानसा ओढा आहे. पावसाळा संपला की साकवाखालच्या पिलरमध्ये लोखंडी पत्रे टाकून ते ओढ्याचे पाणी अडवतात. त्यामुळे साधारण फेब्रुवारी महिन्यापर्यंत ओढ्याचे पाणी टिकते.

बेंडशीळच्या जागेतील ही शेती आणि बाग हे राजीव भटांच्या उपजीविकेचे साधन असले तरी तो काही त्यांचा एकमेव उद्योग नाही. ते या जागेकडे एक कृषीविषयक प्रयोगशाळा म्हणून पाहतात. त्यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून कृषी विषयातील पदवी मिळवली आहे. या जागेतील एकपंचमांश पीक ते घरी वापरतात आणि उर्वरित बाजारात विकतात.

त्यांच्या या जमिनीचे प्रामुख्याने शेत आणि बाग असे दोन भाग आहेत. पावसाळ्यात या परिसरातील इतर बहुसंख्य शेतकऱ्यांप्रमाणेच ते भाताची लागवड करतात. मात्र भाताचे वाण मात्र बासमती असते. बासमतीला साधारणपणे थंड हवामान लागते. ठाणे जिल्ह्यात तसे हवामान पावसाळ्यात नसते. त्यामुळे थोडा सुगंध कमी येत असला तरी बासमतीचे पीक चांगले येते, हा राजीव भट यांचा अनुभव आहे. पावसाळ्यानंतर शेतात ते वाल, चवळी, तूरडाळ ही पिके घेतात. निरनिराळ्या पालेभाज्या, फळभाज्या, वेलवर्गीय भाज्यांची लागवड ते करत असतात. ठाणे जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांपासून हळदीची लागवड केली जात आहे. गेल्या वर्षी तर आदिवासी शेतकऱ्यांनी पिकवलेली हळद 'तारपा' ब्रँडने ठाणे जिल्ह्याच्या शहरी भागात विकली गेली. राजीव भट त्या आधीपासूनच त्यांच्या बागेत हळद लागवड करत आहेत. साध्या



हळदीबरोबरच औषधी गुणधर्म असणारी आंबेहळदही त्यांच्या बागेत मुबलक प्रमाणात आहे. त्यांच्या बागेत विविध प्रकारची देशी-विदेशी फळझाडे आहेत. त्यात प्रामुख्याने आंब्याचा उल्लेख करावा लागेल. हापूस, लंगडा, दशहरा, पायरी, आम्रपाली आदी ४५ प्रकारच्या आंब्यांची लागवड त्यांनी केली आहे. याशिवाय कोकणात आढळणारी सर्व फळझाडे म्हणजे फणस, काजू, पेरू, चिकू, कोकम, नारळ आणि अननस त्यांच्या बागेत आहेत.

सुगंधी फुलांमध्ये तीन प्रकारचे सोनचाफे, सुरंगी, बकुळ, उंडी, नागचाफा; फुलणाऱ्या झाडांमध्ये बहावा, ताम्हण, कैलासपती, गुलमोहर, कांचन; औषधी वनस्पतींमध्ये चंदन, रक्तचंदन, रिठा, हिरडा, कडुनिंब, आंबेहळद; मसाल्याच्या पदार्थांमधील लवंग, जायफळ, काळी मिरी, दालचिनी, हळद, पिंपळी, वेखंड, वेलदोडा अशा शेकडो प्रकारच्या वनस्पती राजीव भटांच्या बागेत आहेत. याशिवाय साग, शिसव, मोरगणी, रोझवुड, आदिन हे वृक्ष आहेत. जळणासाठी विलायती चिंच, रेन ट्री, शिशिर ही झाडे आहेत. या देशी वृक्षांसोबत मॅगोस्टिन, ऐवाकोडा, रांबुरांग, ड्युरीयन, ड्रॅगन फूड ही विदेशी झाडेही इथे सुखाने नांदताना दिसतात.

राजीव भट यांनी ही सारी हिरवाई

अत्यंत नैसर्गिकपणे फुलवली आहे. रासायनिक खतांचा वापर त्यांनी कटाक्षाने टाळला आहे. कारण रासायनिक खतांमुळे फायद्यापेक्षा तोटे अधिक होतात, हे त्यांनी अनुभवाने जाणले आहे. ते म्हणतात, ''सर्वसाधारणपणे शेतकरी स्वस्त रासायनिक खते वापरतात. त्यातील जेमतेम ३० टक्के पिकांना उपयोगी पडतात. उर्वरित खतांमुळे परिसरातील जलसाठे प्रदूषित करतात. वातावरणात मिसळून वायू प्रदूषणही होते. रासायनिक खतांनी युक्त पाणी प्यायल्यामुळे आरोग्य बिघडते. मूतखड्यासारखे विकार बळावतात, असे आढळून आले आहे. खतांचा असा अनावश्यक वापर नियंत्रित करण्यासाठी आपल्याकडे आता शून्य मशागत तंत्राने लागवड केली जाते. या पद्धतीत जमीन नांगरत नाहीत. फक्त बी टाकण्यापुरता एक चर अथवा रेघ ओढली जाते. या पद्धतीमुळे उत्पादनात २५ टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे.''


सर्वसाधारणपणे पीकसंवर्धनासाठी खत आणि संरक्षणासाठी कीटकनाशकांचा वापर केला जातो. मात्र बहुतेक शेतकऱ्यांना ते किती आणि कसे वापरावे हे माहीत नसते. त्यामुळे घोटाळे होतात. पूर्वी रासायनिक खते नव्हती. कीटकनाशकांचाही अभाव होता, तरीही शेतकरी निर्धोकपणे पीक घ्यायचे. त्यासाठी ते त्यांचे पारंपरिक ज्ञान वापरायचे. साधारणपणे चार वर्षांतून एकदा जमीन पडीक ठेवली जायची. त्या काळात जमिनीत पिकांना पोषक असणाऱ्या जिवाणूंची पैदास होते. (आता आधुनिक शेतीतही हीच पद्धत थोडी वेगळ्या पद्धतीने वापरली जाते. आता दरवर्षी शेतातील काही फूट जागा खोदून घेऊन लागवड केली जाते. मोकळ्या ठेवलेल्या जागेत पुढील वर्षी लागवड केली जाते.) पिकांवरील कीड, मुंग्या हटविण्यासाठी एखाद्या वेलीचाच रस काढून तो फवारला जायचा. कडुनिंबाच्या पाल्याची फवारणी त्यादृष्टीने उपयुक्त ठरते. आधुनिक कीटकनाशकांच्या वापरामुळे निराळ्याच समस्या निर्माण होत असल्याचे राजीव भट यांचे मत आहे. ते म्हणतात, ''आपल्याकडे साधारणपणे आंतरप्रवाही, स्पर्शजन्य आणि धुरीजन्य अशा तीन प्रकारची कीटकनाशके असतात. स्पर्शजन्य अथवा धुरीजन्य कीटकनाशकांचे प्रभाव नष्ट केले जातात. भाज्या, फळे धुऊन घेतली तरी काम भागते. आंतरप्रवाही कीटकनाशकांबाबत मात्र तसे म्हणता येत नाही. म्हणजे ठरावीक मुदतीनंतर त्यांचा प्रभाव नाहीस होत असला तरी पिकांमध्ये तो पदार्थ राहतो आणि अन्नाद्वारे शरीरात येतो. तो पदार्थ पचवण्याची ताकद शरीरात नसते. मग त्याचे दुष्परिणाम दिसून येतात. शहरी भागातील माणसं मंडईत गेल्यावर अजिबात कीड नसलेला फ्लॉवर अथवा कोबी घेऊन येतात आणि शुद्ध- स्वच्छ भाजी आणल्याच्या भ्रमात राहतात. खरे तर भाजीला कीड असणे हीच भाजी शुद्ध असल्याचा पुरावा आहे. कीड काढून टाकून तो भाग धुऊन अथवा कापून घेता येतो, पण कीटकनाशकांचा प्रभाव कसा कमी करणार?'

सेंद्रीय अथवा पारंपरिक शेतीची महती केवळ पुस्तकीबाण्याने न गाता राजीव भट आपल्या शेतात ते सप्रयोग सिद्ध करून दाखवतात. त्यामुळे त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे. अशा प्रकारे शाश्वत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची महाराष्ट्रात एक साखळीच आहे. ते एकमेकांच्या अनुभवांचे आदानप्रदान करून सातत्याने शेती उत्तम हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. राजीव भटांनी गेल्या वर्षीपासून त्यांच्या बागेत कृषी पर्यटन केंद्र सुरू केले आहे. त्यामुळे पाच एकरच्या या हिरव्या नवलाईत एक-दोन दिवस राहण्यासाठी मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक परिसरातून पर्यटक येऊ लागले आहेत. या ठिकाणी ते सेंद्रीय पद्धतीने शेती करण्याचे रीतसर प्रशिक्षणही देतात. परिसरातील शाळांमधील विद्यार्थी-शिक्षक येथे शेती पाहायला आणि करून बघायलाही येतात. अनेकांनी निव्वळ गुंतवणूक म्हणून ठेवलेल्या जमिनी पडीक असतात. त्यात काही लागवड केली तर उत्पन्न तर मिळेलच, शिवाय जमिनीची धूप थांबेल. राजीव भट ही वस्तुस्थिती सर्वांना पटवून देण्याचा प्रयत्न करतात.

संपर्क : **राजीव भट**
९३२४६०१२७२
**– प्रशांत मोरे**
moreprashat2000@gmail.com

**अखेर न्याय मिळाला...** (भाग १)

**ॲड. नीलिमा कानेटकर**




सर्वोच्च न्यायालय व देशातील इतर उच्च न्यायालयं यांनी दिलेल्या खटल्यांतील निकाल व तद्नुषंगानं नात्यांमधल्या ताणतणावांचं, भावनिक गुंत्यांचं स्वरूप थोडक्यात विषद करून त्या केसचा मथितार्थ यात वाचकांपुढे ठेवला आहे. घटस्फोटाची विविध कारणं, देशातीलच नव्हे तर परदेशातील न्यायालयांनीही दिलेला न्याय व त्यातील भूमिका यांची मुद्देसूद मांडणी केलेली आहे.

**मूल्य ३५० रु.**
**सवलतीत २०० रु.**

**वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समाजजीवन यांतलं नातं लोकांपर्यंत पोचवायचं असेल, तर शिक्षण हेच त्याचं माध्यम असलं पाहिजे हा आग्रह धरून वेगवेगळ्या माहितीपटांची निर्मिती करणारा समीर शिपूरकर असो, वा समाजातील वंचितांसाठी आपल्या क्षमतेनुसार कार्य करणारं जप्तीवाले हे बहुगुणी दांपत्य असो, दोन्ही ठिकाणी आढळणारा समान धागा म्हणजे समाजाच्या भल्याची असलेली जाण आणि चांगुलपणा.**

**अल्प उत्पन्न गटातील मुले, पालिका शाळांतील मुले, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, गरजू व्यक्ती अशांसाठी काम करताना जप्तीवाले हे दांपत्य रक्तदान, नेत्रदान, देहदान या संकल्पनांचाही प्रचार करतं. तर समीर आणि त्याच्या टीमनं आतापर्यंत अनेक माहितीपटांतून आपला विचार लोकांपर्यंत पोचवला आहे. चांगुलपणाचा झेंडा उंचावत समाजभिमुख काम करणाऱ्या अशा अनेक व्यक्ती-संस्थांनाची माहिती थिंक महाराष्ट्रवर वाचावयास मिळते.**

# अवकाश निर्मिती – समाजहिताची तळमळ

## अंजली कुळकर्णी

शाळेचा वर्ग चालू आहे. मुलांचे चेहरे उत्फुल्ल, त्यांच्या डोळ्यांत चमकतोय शिकण्याचा, कुतूहलशमनाचा, काहीतरी छान समजल्याचा आनंद. मुलं इतकी उत्साहात, की जणू कोणतातरी खेळच खेळतायत! आणि खरंच, खेळच सुरू आहे तिथं. काही शिक्षक, शाळेचा एखादा कर्मचारी आणि काही मुलं असे सातजण एका ओळीत उभे आहेत. सातजणांना मिळून एक वाक्य तयार करायचं आहे. एक अर्थपूर्ण वाक्य. कुणालाच माहीत नाही, दुसऱ्याच्या मनात कोणता शब्द आहे. एकानं कोणतातरी शब्द उच्चारून सुरुवात करायची. पुढच्यानं त्यात भर टाकत त्यात अर्थ भरायचा. कर्ता, कर्म, सर्वनाम, विशेषण, क्रियापद असे सहा शब्द आणि शेवटी विरामचिन्ह मिळून वाक्य तयार करायचं. असं वाक्य तयार करणारी आणि बघणारी सारी मुलं आनंदानं टाळ्या पिटू लागली. सारा वर्ग एक नवी गोष्ट शिकल्याच्या आनंदानं भरून गेला.


हे दिवास्वप्न नाही. कोल्हापूरच्या 'सृजन आनंद' शाळेतलं हे वास्तववादी दृश्य आहे. 'मूलगामी' या शॉर्ट फिल्ममधलं.



समीर शिपूरकर

कोल्हापूरला लीला पाटील यांनी 'सृजन आनंद' नावाचा शिक्षणक्षेत्रातला सुंदर प्रयोग साकार केला आहे. त्यांच्या अनेक वर्षांच्या ध्यासातून ते सुरेख स्वप्न साकार झालं आहे, त्या सुंदर स्वप्नाला या शॉर्ट फिल्ममध्ये बद्ध केलं गेलं आहे. शॉर्ट फिल्मचा निर्माता, दिग्दर्शक आणि सर्वच काही आहे समीर शिपूरकर. त्याला साहाय्य आहे त्याच्या 'अवकाश निर्मिती'च्या तरुण टीमचं. पंचवीस ते चाळीस या वयोगटातले हे सगळे तरुण अस्वस्थ आहेत. आजुबाजूला जे घडतंय त्याचा राग त्यांच्या मनांमध्ये खदखदतोय. जागतिकीकरणाच्या नावानं पाश्चिमात्य संस्कृतीचं जे आंधळं अनुकरण चाललंय प्रत्येक गोष्टीचं बाजारीकरण, वस्तुकरण होत आहे, सामाजिक विषमतेची दरी भेडसावण्याइतकी रुंद बनत चाललीय, त्या सगळ्याविरुद्ध या मुलांचं काहीतरी म्हणणं आहे. समीर शिपूरकर आणि 'अवकाश निर्मिती'च्या टीमनं शॉर्ट फिल्म्सच्या माध्यमातून ते मांडायचा प्रयत्न चालवलाय. 'मूलगामी'खेरीज पाबळच्या विज्ञानाश्रमा-वरची 'विज्ञानाश्रम – शिक्षणातून विकास', डॉ. अनिल सदगोपाल यांची 'उत्पादक काम और स्कुली शिक्षा' या मुलाखतीवरची फिल्म, अशा काही फिल्म्स त्यांनी तयार केल्या आहेत.

समीर मूळचा निपाणीचा. त्याचे वडील रमेश शिपूरकर आणि काका सुरेश शिपूरकर हे पुरोगामी चळवळीतले, मागच्या पिढीतले खंदे कार्यकर्ते. राष्ट्रसेवादल, छात्र भारती यांच्याशी अगदी जवळून जोडले गेलेले. समीर त्याच वातावरणात वाढला. तो लोकशाही, स्वातंत्र्य आणि समतेचं बाळकडूच प्यायला. इंजिनीयरिंगचं शिक्षण घ्यायला म्हणून समीर पुण्यात आला. त्यानंतर त्यानं दोन वर्षं विज्ञानाश्रमात काम केलं. तब्बल दहा वर्षं त्यानं





**शिपूरकर यांनी तयार केलेले माहितीपट**

इंजिनीयरिंग इंडस्ट्रीमध्ये नोकरी केली. तेव्हा त्याला मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीतलं अमानवीपण बोचायला लागलं. त्याची पत्नी अंजली चिपलकट्टी हिनं त्याला पूर्ण पाठिंबा दिला. समीरनं नोकरी सोडून दिली. नंतर अंजलीचं पोस्टिंग अमेरिकेत झालं म्हणून ते तिकडे गेले. दरम्यान त्यांच्या मुलाचा जन्म झाला.

अमेरिकेत, कनेटिकटमध्ये समीरला त्याच्या अस्वस्थतेमधून बाहेर काढणारं छान काम सापडलं. तिथल्या स्थानिक केबल टीव्ही केंद्रावर समीरनं विनामोबदला पहिल्यांदा कॅमेरा हाताळला, इतरही तंत्रं शिकून घेतली आणि त्याच्या लक्षात आलं, की हेच आपलं काम आहे! भारतात परतल्यावर समीरनं सुमित्रा भावे आणि सुनील सुकथनकर यांच्या दोन-तीन फिल्म्ससाठी काम केलं. अतुल पेठेबरोबर माहितीपटाचं काम केलं.

समविचारी, कमिटेड मुलांचा ग्रुप जमत गेला आणि 'अवकाश निर्मिती'ची सुरुवात झाली. त्याची बायको अंजली, अमितराज देशमुख, स्वप्नाली पाटील, मेदिनी डिंगरे, शिल्पा बल्लाळ, छाया गोलटगावकर, राधिका मूर्ती, बन्सीधर किंकर यांचा त्यात समावेश आहे. या सर्वांना समाज-जीवनाशी जोडून घेणारं काम करायचं आहे. जागतिकीकरणाच्या वरवंट्याखाली भुईसपाट होणारं इथलं सारं काही त्यांच्या अस्वस्थतेचं कारण आहे. समीर सांगत होता, ''व्यापकत्वाशी जोडून घेणारं इथलं समाजमन मला महत्त्वाचं वाटतं. इथल्या लोकांची बुद्धिमत्ता, त्यांच्या प्रेरणा, त्यांच्या इच्छा-आकांक्षा यांना न्याय देणाऱ्याच व्यवस्था इथं पाहिजेत.''

''ग.प्र. प्रधानांची सर्वांत शेवटची मुलाखत समीरनं केली होती. अत्यंत उत्कट आणि जणू संपूर्ण जीवनाचं सार आता शेवटचं सांगून टाकायचं आहे अशी ही सुंदर, सर्वस्पर्शी मुलाखत झाली. त्यात ते म्हणाले आहेत, अर्थकारण हे फार फार महत्त्वाचं झालं असलं तरीही मानवी मूल्यं आणि समतावादी विचार बाजूला सारून चालणार नाही. तो विचार पोचवण्याचं काम आम्ही फिल्म्सच्या माध्यमातून करतोय'', समीर उत्कटतेनं बोलत होता.

समीरनं फिल्म्स करण्यासाठी शिक्षण हाच विषय का निवडला याविषयी उत्सुकता होती. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची ताकद आणि समाजाचं जीवन यांतलं नातं लोकांपर्यंत खऱ्या अर्थानं पोचवायचं असेल, त्यांच्यापर्यंत विज्ञानाचा दृष्टिकोन पोचवायचा असेल तर शिक्षण हेच त्याचं माध्यम असलं पाहिजे हा समीरचा आग्रह आहे.

''यात demystificationचा मुद्दाही आहे.'' समीर सांगत होता. ''आपल्याकडे ज्ञानाचा बागुलबुवा केला जातो. एक तर ते काहीतरी अत्यंत पवित्र किंवा गुप्त आहे असं भासवलं जातं. असं प्रत्येक क्षेत्रात होतं. रचनाच अशी असते की ते सामान्यांना कळूच नये. पण विज्ञानाश्रमात यंत्र हातात आलं की मुलांना ते प्रथम मोडायला सांगितलं जातं. यंत्र तोडून, मोडून त्याची रचना पाहा असं सुचवलं जातं. मुळात विज्ञान म्हणजे काय? केवळ परीक्षानळी, मायक्रोस्कोप? आणि तंत्रज्ञान म्हणजे काय? त्याचा जीवनाशी काय संबंध आहे, ते समजण्यात, वापरण्यात कुठला आनंद लपलेला आहे हे मुलांपासून लांब ठेवलं जातं. आपला परिसर, आपल्या भोवतीचा निसर्ग हाच केवढा मोठा अभ्यासक्रम आहे हे जीवनोपयोगी कामं शिकून, त्यातले पैशाचे व्यवहार समजून घेऊन विक्रीपर्यंतची कामं मुलं तिथं करतात. प्रयोगातून शिकणं, निरीक्षण करणं, अनुमान काढणं या केवळ प्रयोगशाळेत करण्याच्या गोष्टी नाहीत तर प्रत्यक्ष जीवनातही त्यांचा अवलंब करण्याचं महत्त्व तिथं मुलांवर बिंबवलं जातं. कार्यकेंद्रित शिक्षण हा तिथल्या शिक्षणाचा गाभा आहे, म्हणून विज्ञानाश्रमावर फिल्म करायचं ठरवलं.





**(डावीकडून)**
**अतुल पेठे,**
**समीर शिपूरकर**
**आणि**
**लीलाताई पाटील**

''World of work आणि World & Education ही दोन स्वतंत्र विश्वं असतात असा समज आहे. काम वेगळ्या लोकांनी करायचं असतं आणि ज्ञान वेगळ्या लोकांनी घ्यायचं असा समज समाजात खोलवर रुजलेला आहे, पण ही दोन्ही जगं एकत्र आणायला पाहिजेत हा विचार तिथं केलेला आहे.''

समीर सांगत होता, की ''आपली शैक्षणिक धोरणं सारखी बदलत असतात. पण पुढच्या पन्नास वर्षांसाठी काय धोरण असायला हवं, पुढच्या पन्नास वर्षांतलं शिक्षण कसं असेल त्या दिशेनं आमचा प्रवास आहे. तशी मांडणी आम्ही करत आहोत. त्यासाठी जनसामान्यांपर्यंत आणि धोरणांपर्यंत पोचणं हे आमचं उद्दिष्ट आहे.''

डॉ. अनिल सदगोपाल यांची 'उत्पादक काम और स्कूली शिक्षा' या फिल्ममधली मुलाखत शिक्षणविषयक समजूत स्पष्ट होण्यासाठी फार महत्त्वाची आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण सार्वत्रिक करण्यासाठी व्यवस्था आमूलाग्र बदलावी लागेल आणि त्यासाठी दीर्घकाळ काम करावं लागेल याचं भान हा माहितीपट देतो.

ज्येष्ठ विज्ञानप्रसारक अरविंद गुप्ता यांच्याशी या ग्रुपची वैचारिक जवळीक आहे. रमेश पानसे यांच्याही विचारांचा प्रभाव त्यांच्यावर आहे. पानसे यांनी मानवी मेंदूच्या शिकण्याच्या क्षमतांच्या संदर्भात मांडलेल्या विचारांची बैठक त्यापाठीमागे आहे.

समीरच्या शिक्षणविषयक या फिल्म्स तीन स्तरांवर काम करतात. जे शिक्षक आहेत त्यांना त्यातल्या methodologies दिसतात. 'मूलगामी' बघून अनेक शिक्षक म्हणतात– आम्ही अशाच पद्धतीनं गणित, भूगोल, भाषा शिकवू. किंवा काही वेळा त्यांना वाटतं, की हे सगळं चित्र फिल्ममधून 'छान छान' दिसतं, पण आम्ही ते तसं शिकवू शकू का? आम्हाला तसं स्वातंत्र्य आहे का? जे या मेथडॉलॉजीच्या पलीकडे जातील त्यांना त्यातून शिक्षणशास्त्र जाणवू लागेल. शिक्षण का, कसं आणि कशासाठी या प्रश्नांपर्यंत पोचतील, शाळापातळीवर त्याचा उपयोग कसा करता येईल याचा विचार करतील आणि त्याच्याही पलीकडे जाऊन त्यापाठीमागचं राजकारण, अर्थकारण, समाजकारण आहे त्यात उतरावं लागेल. भूमिका घ्यावी लागेल.

''आमच्या या तिन्ही फिल्म्स मिळून हेच मांडायचा प्रयत्न आम्ही केलाय'', समीर सांगतो, ''प्रत्येकानं आपापल्या स्तरावर याच्याशी जोडून घेणं, त्यात भर टाकणं आवश्यक आहे. किमान react व्हावं असं आमचं म्हणणं आहे.''

समीरच्या ग्रुपनं या फिल्म्स राष्ट्रपतींपर्यंत, राजकारणी, नेते, शासकीय अधिकारी यांच्यापर्यंत पोचवण्याचे प्रयत्न केले आहेत. त्या जनसामान्यांपर्यंत पोचाव्या यासाठी त्यांनी त्या Internet वर मोफत उपलब्ध ठेवल्यात. प्रत्येक फिल्मचं मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांत/रूपांतर चालू आहे आणि ''हे केवळ शिक्षणाच्या प्रश्नापुरतं नाही, तुकड्या तुकड्यानं नाही; तर समग्र मानवी जीवनाशी संबंधित आहे, 'माझ्या अस्तित्वाला हीन लेखलं जातं, तू मूर्ख आहेस, कनिष्ठ आहेस' असं सांगितलं जातं. त्याविरुद्ध हे आवाज उठवणं आहे. भारतीय व्यवस्थांचं जतन करण्याची भावना त्या पाठीमागे आहे. मेकॉलेपासून इथलं शिक्षण ते ठरवतायत. परदेशी कंपन्या बँकासुद्धा इथं काढणार आहेत. काही वर्षांनंतर भारतीय शिक्षणव्यवस्थाच उखडून जाईल, त्याला हा विरोध आहे.'' – समीर बजावतो.

समीरचा ग्रुप विचारवंत वसंत पळशीकर यांच्यावर फिल्म करत आहे. समग्र मानवी जीवन, त्याचं कल्याण, मानवी मूल्यं आणि मानवी भावना वर याव्यात याच्यासाठी अनाग्रही तरीही ठाम पद्धतीनं विचार मांडणारे वसंत पळशीकर यांच्या विचारांचं दर्शन त्यात असेल, 'स्टोरी ऑफ स्टफ' या गाजलेल्या फिल्मचं मराठी रूपांतर करण्याची परवानगी त्यांना मिळालीय. 'लाखमोलाची गोष्ट' या नावानं ती येतंय.

हे सगळे तरुण स्वत:ला एका व्यापक चळवळीशी –ज्याला आज alternative media किंवा independent media म्हटलं जातं त्याच्याशी जोडून घेतात. समाजाच्या व्यापक हिताशी film makingच्या माध्यमातून स्वत:ला जोडून घेतात. त्यांना समाजाकडून पैसे मिळतात तरीही कित्येक वेळा पैसा अपुरा पडतो. ते आपलं कौशल्य, बुद्धिमत्ता, वेळ, पैसा याचं मूल्य करत नाहीत. पण हे कायम स्वरूपी कसं चालणार याची चिंता त्यांना आहे.

**अंजली कुलकर्णी**
३–विघ्नहर अपार्ट, जयवर्धमान
सोसायटी, बिबवेवाडी रस्ता,
पुणे ४११०३७
भ्रमणध्वनी ९९२२०७२१५८
anjalikulkarni1810@gmail.com

**समीर शिपूरकर**
sameership@yahoo.com

# जप्तीवाले!

## सतीश राजमाचीकर



चंद्रहास आणि सुनंदा जप्तीवाले

वंचितांचा विचार करून त्यांच्या विकासासाठी झटणारी माणसे समाजात आहेत. अशा व्यक्ती स्वतःच्या पलीकडे विचार करतात, आचरण करतात. अशाच एका जोडप्याला मी भेटलो. ते दांपत्य आहे सुनंदा आणि चंद्रहास जप्तीवाले. दोघांचे वय पन्नाशीच्या अलिकडे-पलीकडे. चंद्रहासांनी बँकेतून स्वेच्छानिवृत्ती घेतली. मग आपल्या हाती असलेल्या वेळेचा सदुपयोग करायचे उभयतांनी ठरवले आणि ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभासदांच्या सहकार्याने आपल्या घराजवळच्या पालिका शाळेतील अल्पउत्पन्न गटातील मुलांसाठी सुट्टीच्या काळात व्यक्तिमत्त्व विकास शिबिर आयोजित केले.

सुनंदा आणि चंद्रहास जप्तीवाले यांची मुलगी अश्विनी हिचा वयाच्या तेविसाव्या वर्षी, १ ऑगस्ट २००५ रोजी, वाडिया कॉलेजजवळ अपघाती मृत्यू झाला. दुःखाचा डोंगर कोसळलेला असतानाही चंद्रहास जप्तीवाले यांनी अश्विनीच्यो (तिने पूर्वी व्यक्त केलेल्या ) इच्छेप्रमाणे तिचे नेत्रदान केले. अश्विनीच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्या दांपत्य तिच्या नावाचा कौटुंबिक खासगी ट्रस्ट तयार केला. अश्विनीने नोकरीतून साठवलेले तसेच जप्तीवाले दांपत्याने तिच्यासाठी ठेवलेले पैसे त्या ट्रस्टमध्ये जमा करण्यात आले. जप्तीवाले दांपत्य आपण करत असलेल्या कामासाठी कोणत्याही प्रकारची देणगी न स्वीकारता या ठेवीच्या व्याजातूनच आपले कार्य करत असतात.

अश्विनीच्या प्रथम स्मृतिदिनी, १ ऑगस्ट २००६ रोजी, 'अॅश, तू जिंकलंस' हे तिच्या आठवणींचे पुस्तक प्रकाशित करण्यातत आले. त्या पुस्तकात काही समदुःखी पालकांचे त्यांच्या पाल्यांसंबंधीचे लेखही समाविष्ट करण्यात आले आहेत. जप्तीवाले दांपत्य समदुःखी दांपत्यांना भेटून हे पुस्तक भेट देतात. तळेगाव दाभाडे येथे ट्रस्टतर्फे देणगी देऊन अश्विनी सभागृह बांधण्यात आले आहे. त्यानंतर १ ऑगस्ट २०१० पासून अश्विनीच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'अश्विनी जप्तीवाले स्मृती संजीवनी पुरस्कार' देण्यास सुरुवात करण्यात आली. ५००० रुपये रोख, स्मृीतिचिन्ह, गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

मध्यमवर्गीय सुखवस्तू कुटुंबातील मुलांवर घरच्या घरी संस्कार होतात. मुलांच्या गरजा विनासायास पुरवल्या जातात. उलट परिस्थिती पालिका शाळांतील मुलांची असते. तिथे तर मूलभूत गरजा भागवण्याची मारामार! मग कसले संस्कार आणि कसल्या सोयी! हे सत्य पाहून, जाणून ह्या उभयतांनी ठरवले की त्या मुलांवर संस्कार घडवायचे, तेही त्यांच्या कलाने, आणि त्यांच्या छंदातून. त्यासाठी त्यांनी प्रथम एका आठवड्याचे शिबिर आयोजित केले. ओळखी-ओळखीतून अनेक कुशल व्यक्ती ह्या शिबिरात विविध उपक्रम शिकवायला आपणहून पुढे आल्या, त्याही विनामोबदला.

असे पहिले शिबिर ९ मे २००६ रोजी वारजे येथील 'आपलं घर' या अनाथालयात घेतले गेले. दुसरे ऑक्टोबर २००६ मध्ये बोपोडीच्या विद्यानिकेतन शाळेत. शिबिरांत अल्पउत्पन्न गटातील मुलांना सकाळी १० ते संध्याकाळी ६ पर्यंत विविध विषयांतील तज्ज्ञ मंडळी मार्गदर्शन करतात. हे दांपत्य स्वखर्चाने शिबिरकाळात लागणारे सगळे साहित्य, सामग्री आणि संध्याकाळचा नाश्ता पुरवते. एप्रिल २००७ पासून पालिका शाळा क्रमांक १२८/ब, शास्त्रीनगर, पौड रोड, येथे ५वी ते ७ वी

च्या मुलांसाठी नियमित शिबिरे भरवली जाऊ लागली. प्रसिद्ध व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर हे दोन-तीन तास मुलांमध्ये मूल होऊन रमले. त्यांनी चित्रांची खैरात केली. मुलांना गमतीजमतीतून विज्ञान, पर्यावरण, गणित, नकाशावाचन, ओरिगामी, जादूचे प्रयोग, आपत्कालीन सुरक्षितता इत्यादी विषय शिकवले जातात. जुन्या कपड्यांपासून पायपुसणी बनवणे, कागदी फुले, वस्तू, भेटकार्डे बनवणे, रांगोळी काढणे अशा कलांमधून मुलांच्या कल्पकतेला चालना दिली जाते. यातून व्यक्तिमत्त्व विकास साधला जातो. आरोग्यतपासणी, खेळ, योगासने, पौगंडावस्थेतील शंकांचे निरसन असेही उपक्रम हाताळले जातात. मुलांना सहलीला नेले जाते. त्यातून निसर्ग निरीक्षण, पशू-पक्षी, पर्यावरण, विज्ञान यांचे ज्ञान मुलांना सहजरीत्या दिले जाते. तर कधी कधी, मुले आणि ज्येष्ठ नागरिक उत्स्फूर्तपणे बाहुला-बाहुलीचे लग्न अगदी वाजत-गाजत, थाटामाटात लावतात. सर्वजण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने हा सोहळा पार पाडतात. यातून आपुलकीचे नाते हळुहळू निर्माण होऊ लागले आहे. समजुतीचा सेतू बांधला जाऊ लागला आहे. शिबिराच्या शेवटी वेगवेगळ्या स्पर्धा घेऊन बक्षिसे दिली जातात.

ह्या शिबिरांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळू लागला आहे. खरे तर, अशी शिबिरे एकाच वेळी अनेक ठिकाणी भरवली जावीत असे मी सुचवले. त्यासाठी लागणारा वेळ, व्यवस्थापन आणि आर्थिक मदत उपलब्ध झाली तर जास्त मुलांचा फायदा होईल. त्यासाठी वेगवेगळ्या विभागांतील उत्साही मंडळींनी पुढाकार घ्यायला हवा, एकत्र यायला हवे आणि एक साखळी निर्माण व्हायला हवी असे त्या दोघांनाही वाटते. असे झाले तर पालिका शाळांतील मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला गती मिळेल आणि अशी सुसंस्कारित मुले वाममार्गाला जाणारही नाहीत, कदाचित.



**या एचआयव्हीग्रस्त मुलांसाठी आयोजित शिबिरात आपणच तयार केलेले मुखवटे घातलेली मुले**

हे दांपत्य केवळ अशी शिबिरे घेऊन थांबलेले नाही. गरजू मुलांना उच्च शिक्षणास आर्थिक मदत, मुले-महिला-वृद्धाश्रम यांना आर्थिक मदत मिळवून देणे, अनाथाश्रमातील मुलांसाठी कपडे- खेळणी-वस्तू-पुस्तके गोळा करणे, गरीब गरजू व्यक्तींना वैद्यकीय खर्चासाठी आर्थिक मदत करणे- मिळवून देणे अशा अनेक कामांबरोबर रक्तदान, नेत्रदान, देहदान या संकल्पनांचा ते प्रचारही करतात. रस्ते सुरक्षा अभियानातर्फे वाहतूक सुरक्षा कार्यक्रमात सहभागी होतात. त्यांनी पालिका शाळेत बालवाचनालय सुरू केले आहे. चंद्रहास जप्तीवाले यांनी आतापर्यंत ६८ वेळा रक्तदान केले आहे. वैयक्तिक पातळीवरही आपण काय काय करू शकतो याचा हे दांपत्य म्हणजे आदर्श आहे.



**मुलींसाठीच्या वसतिगृहासाठी आयोजित करण्यात आलेले रांगोळीचे वर्ग**


संपर्क

अश्विनी जप्तीवाले मेमोरियल ट्रस्ट
२, आराधना अपार्टमेंट, प्लॉट नं. ८७/६,
डावी भुसारी कॉलनी, पौड रोड,
कोथरूड, पुणे ४११०३८,
फोन ०२०-२५२८०७४४,
भ्रमणध्वनी ९८९०९०१६३६

**सतीश राजमाचीकर**
smrajmachikar@gmail.com
भ्रमणध्वनी ९८२३११७४३४

# दोन वर्षांत दहावी आवृत्ती!




## पंखाविना भरारी!

**शरयू घाडी**

प्रसाद हा अतिविकलांग मुलगा. कोपरापुढे हातांची होणारी मंद हालचाल आणि कुशाग्र बुद्धिमत्तेची देणगी एवढीच त्याच्या शारीरिक जमेची बाजू. असा हा प्रसाद आपल्या इच्छाशक्तीने, कर्तृत्वाने केवळ एकवीस वर्षांच्या उण्यापुऱ्या आयुष्यात एक दंतकथा बनला. शिक्षण, गायन, वक्तृत्व, चित्रकला यातील त्याने केलेली कामगिरी आपल्यातील अपूर्णत्वाची जाणीव करून देते. प्रसाद म्हणजे निसर्गाचा अनाकलनीय आविष्कार. त्याच्या जीवनाची आणि त्याच्या आई-वडिलांच्या समर्पणाची ही कहाणी आहे.

**मूल्य : २०० रुपये**  **सवलतीत : १२० रुपये**

---

### ग्रंथालीचे नवे प्रकाशन




# अरूपाचे रूप

**माणिक गुट्टे**

कवीच्या या डोळस स्वागतशीलतेमुळे त्याला परंपरेचे विसर्जन करण्याची गरज भासत नाही. त्याच्या परंपरेचे स्वाभाविक पर्यवसान आधुनिकतेत झालेले दिसते. मग तो कोणत्याही प्रकारच्या दैवी अधिष्ठानाशिवाय किंवा पारलौकिक संदर्भाशिवाय मानवाच्या भ्रातृभावाचे समर्थन निखळ भौतिक चौकटीतून करू शकतो...

स्वत:बद्दल, समाजाबद्दल आणि आपल्या भोवतालाबद्दल सारखीच संवेदनशीलता बाळगणाऱ्या माणिक गुट्टे यांच्या प्रस्तुत संग्रहामुळे मराठी काव्यसृष्टी अधिक समृद्ध झाली आहे.

**– डॉ. सदानंद मोरे**

**मूल्य १२५ रुपये**
**सवलतीत ७५ रुपये**

# कलानगरीतील वाटचाल

डॉ. माधवी मेहेंदळे

फ्रान्समधल्या कलानगरीत आम्हा दोघा मैत्रिणींची भ्रमंती सुरू होती. गॅलरीत लावलेली चित्रं व रस्त्यांमध्ये, इमारतींमध्ये, ट्रेनमध्ये 'लावलेली' माणसं न्याहाळणं सुरू होतं.

डोळे 'बघण्याचं' थांबेपर्यंत लूव्र म्युझियम बघून झालं. म्हणजे जेवढे झेपणं शक्य होतं तेवढं बघून झालं.

आधीच्या दिवसांची चित्रविचित्र जेवणं पचवून आम्ही आमचा मोर्चा 'पिकासो' म्युझियमच्या दिशेनं वळवला. तिथे वाटेत चक्क एक भारतीय रेस्टॉरंट दिसलं. व्हेजिटेरीयन म्हणजे काय हे समजण्याच्या पलीकडे असलेल्या एका रेस्टॉरंटमध्ये आदल्याच रात्री 'व्हेजिटेरीयन' सॅलडमध्ये पानापानांत दडलेले मांसाचे तुकडे खरवडून बाहेर काढून ते सॅलड खाल्लं होतं. मनात व पोटात ढवळणाऱ्या सर्व विचारांना निग्रहानं मागे सारून! त्या पार्श्वभूमीवर भारतीय रेस्टॉरंटचं दर्शन फारच सुखद होतं.

तिथल्या मालकाशी गप्पा मारल्या. त्याला शेजारच्या गल्लीत कुठलंतरी 'पेंटिंग म्युझियम' आहे याची कल्पना होती, पण 'पिकासो' हे नाव काही माहिती नव्हतं!

आम्हाला मजा वाटली. ज्या पिकासोला भेटायला आम्ही पृथ्वीचा अर्धा पृष्ठभाग ओलांडून आलो होतो, तिथेच शेजारच्या गल्लीतल्या माणसाच्या मनात पिकासोला थारा नव्हता.

पिकासो म्युझियमच्या दाराशी उभं राहून मी माझा एक फोटो काढून घेतला. किती मजेत होते मी तेव्हा. 'मजेदार' काहीतरी बघायला मिळणार म्हणून! क्युबिझमचा जनक. चित्रविचित्र स्त्री-पुरुषांची मोडतोड करून चित्र काढणारा एक तऱ्हेवाईक चित्रकार, 'गुर्निका' चित्राचा संदर्भ, अर्थ, संकेत मला एकदा डॉ. अनिल अवचटांनी समजावून सांगितला होता. तीन वेश्यांचं त्यानं काढलेलं एक चित्र डोळ्यांसमोर तरळत होतं.

मॉडर्न आर्ट किंवा अमूर्त चित्रकला पाहताना असं वाटायचं, की ही पळवाट आहे का मूर्त चित्रकलेपासून? म्हणजे त्यात आनंद नक्की आहे. दृश्यसुख आहे, पण जसं चेहरा-डोळे काढताना एखादी रेघ, एखादा रंग पूर्ण चेहरा बिघडवू शकतो तसं अमूर्त (abstract) चित्र काढताना होत नाही. थोडी रेषा इकडची तिकडे झाली, रंग वेडावाकडा झाला तरी चित्राचा बेरंग होणार नाही किंवा इथे तर बेरंगच निर्माण करायचा आहे, चेहरा बिघडलेलाच काढायचा आहे - असा बिघडला काय आणि तसा बिघडला काय?

पिकासीने काढलेली काही वास्तववादी (realistic) चित्रं पाहिली. मला हादराच बसला. अप्रतिम चित्रं होती. म्हणजे वास्तववाद पूर्ण आत्मसात करून, त्यात अप्रतिम कौशल्य प्राप्त करून तो 'त्या' पलीकडे पोचला होता. वास्तववादाच्या सीमारेषा त्यानं कधीच ओलांडल्या होत्या.

पिकासोच्या म्युझियमबद्दल लिहायच्या आधी थोडं वाचावं असा विचार करून माधुरी पुरंदरेंनी लिहिलेलं 'पिकासो' वाचायला घेतलं होतं. झपाटल्यासारखं, अधाशासारखं वाचून काढलं. पिकासो मेला आणि पुस्तक संपलं. पण आता 'पिकासो' नावाच्या एका राक्षसी वादळाची थोडी कल्पना आली. मी सुन्न झाले. पिकासो म्युझियमच्या दाराशी मजेत उभी असलेल्या माझा फोटो पाहिला आणि माझी मलाच कीव आली. पिकासो म्युझियमच्या शेजारी असूनही त्या भारतीय रेस्टॉरंटच्या मालकाला पिकासोचं नावही माहीत नव्हतं, तेव्हा मला त्या मालकाचीही अशीच कीव आली होती. तेव्हा मी किती मजेत होते. पिकासोबद्दलच्या जुजबी अज्ञानात सुखी होते. पण आता? आता मी काय लिहू असं मला वाटतंय. आता त्याच्या चित्रांचे फोटो बघताना त्यातल्या व्यक्तिरेखा जिवंत होऊन पुढे येणार. ओल्गा, मारी तेरेसा, फ्रान्सवाझ वगैरे कित्येक. त्याचबरोबर त्यांनी पिकासोबरोबर जगताना झेललेले प्रसंग, व्रण, अपमान - सर्वकाही. त्याची राक्षसी निर्मितिक्षमता! एका दिवसात १० कॅनव्हास? कुठल्याही नॉर्मल माणसाला हे शक्य नाही. चित्राची कल्पना मनात रूजून, विचार डोक्यात शिरून, त्यावर मेंदूत प्रक्रिया होऊन नंतर त्याची अभिव्यक्ती कॅनव्हासवर... एवढं सगळं एका चित्राचं करतानाच कलाकाराला मानसिक तरी थकवा येत असणार. इथे म्हणजे सिलेंडरमध्ये प्रेशरनं भरलेला गॅस जणू बाहेर यायची वाट पाहणारा. व्हॉल्व्ह/तोटी उघडायचा अवकाश, भराभरा बाहेर येणार!

नव्वद वर्षांचं आयुष्य आणि अखेरपर्यंत अविश्रांत काम. चित्रकला, शिल्पकला, मुद्राचित्र, नाटक, सिनेमा - काही करायचं राहिलंय का? सगळं करून झालंय. खायला



**अंथरुणात उशीला टेकून आरामात पहुडलेल्या स्त्री**

नाही, चित्रं विकली जात नाहीत, या दुर्दशेपासून असीम श्रीमंती, असीम नावलौकिक. प्रेक्षणीय स्थळं बघायला यावं तसे टुरिस्ट नुसतं त्याला बघायला येतात. सगळंच टोकाचं.

कम्युनिस्ट जगात त्याचा शिरकाव, पक्षासाठी काम, विचित्र स्वभाव, स्वत:चीच विधानं असंख्य वेळा बदलायची-खोडून काढायची.

लोक रोजनिशी लिहितात तशी तो चित्रं काढायचा. त्याची चित्रं हीच त्याची रोजनिशी. त्यातून त्याच्या मनातली आंदोलनं, बाहेरच्या जगात चाललेल्या घडामोडींवरच्या त्यांच्या प्रतिक्रिया, आयुष्यात डोकावणाऱ्या, असणाऱ्या अनंत स्त्रिया, त्या स्त्रियांबरोबरचं त्याचं नातं - कधी हळुवार, कधी आक्रस्ताळं, कधी विस्फोट-उद्रेक, वेश्यागृह, गिटार, बैल - निळा कालखंड - गुलाबी कालखंड... बापरे कितीतरी!

अखंड काम - पिसाटासारखं अचाट काम - त्याच्या प्रत्येक दु:खावर, एकटेपणावर, आपली स्त्री आपल्याला सोडून जाईल या भीतीवर, मृत्यूच्या विचारांपासून लांब पळण्यावर 'चित्र करतं राहणे' हाच एक रामबाण उपाय त्याला सापडला होता.

त्याच्या क्युबिझमनं जगात खळबळ माजवली. केवळ चित्रकलेतच नाही तर शिल्प, नृत्य, संगीत, वास्तू, साहित्य हे सर्वच ढवळून निघालं.

एखाद्या आकृतिबंधाचं विश्लेषण करून ते अनेक अंगांनी, अनेक कोनांतून बघण्याचा क्युबिझमचा प्रयत्न! शिल्पाला जशा अनेक बाजू असतात तशा चित्रालाही असायला हव्या आणि त्या एका दृष्टिक्षेपात दिसायला हव्या. चित्रालाही शिल्पासारखी पूर्णावस्था प्राप्त व्हायला हवी. अशी काहीशी क्युबिझमची संकल्पना होती. त्यानं पारंपरिक चित्रकलेची सर्व मूल्यं पायदळी तुडवली.

'चित्र करता करता श्वास स्तब्ध व्हावा' ही त्याची नव्वदाव्या वर्षीची इच्छा.

या सगळ्याचं ओझं आता माझ्या मनावर होतं. माधुरी पुरंदरेंच्या पुस्तकामुळे त्या पिसाटाचं थोडंसं रूप मला बघायला मिळालं. पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटलं आहे, की 'एखादी कलाकृती पाहणं हा अनुभव मोठा आनंददायी आहेच पण त्याचबरोबर कलाकृतीच्या निर्मात्याशी ओळख असेल तर त्या रेषा आणि रंग अधिक बोलके होतात.'

खरंच आहे ते. पिकासोची चित्रं नुसतं बोलत नाहीत, ओरडतात, आक्रस्ताळेपणा करतात, वादळं उठवतात.

पॅरिसमधल्या त्याच्या म्युझियममध्ये तीन निग्रो स्त्रिया जेवढ्या छान काढल्या आहेत, तेवढंच छान एका अंथरुणात उशीला टेकून आरामात पहुडलेल्या गोऱ्या-गुलाबी नग्न स्त्रीचं चित्र आहे. तिची देहबोली अप्रतिम.

'स्वस्तातलं जेवण' (Le Repas Fru-gal) हे पिकासोचं उत्कृष्ट मुद्राचित्र तिथं बघायला मिळालं. टेबलाशी बसलेलं एक जोडपं. खंगलेलं. स्त्री शून्यात बघताना. सर्वांत लक्ष जातं ते लांबसडक-निमुळत्या हाताच्या बोटांकडे - फक्त हाडं उरली आहेत असं वाटतं. दोघांच्या नात्यातली ओढ संपलेली, पण नातं सवयीचं. समोर रिकामी जेवणाची थाळी - अंगावर काटा उभा राहतो.

पिकासोतल्या शिल्पकाराशी माझी तिथं ओळख झाली. 'शेळी' (Sheep) हे त्याचं देखणं शिल्प तेथे आहे. कशाचाही वापर करून - जे सापडेल ते - लोखंडी पाईप, टोपली असं वापरून त्यानं ते शिल्प केलं आहे. ते बघताना खूप आनंद होतो. देखणी, गुळगुळीत, संगमरवरी, प्रमाणबद्ध रोम-फ्लॉरेन्समधली शिल्प पाहतानाही एवढा झाला नसेल. ती सुंदर शिल्पं म्हणजे स्वर्गाचं दर्शन आणि ही रोजच्या जीवनातील कुठल्याही वस्तू वापरून केलेली शिल्पं म्हणजे एखाद्या लहान खोडकर-खेळकर मुलाशी केलेलं मजेदार संभाषण. आपल्यातलं लहान मूल पिकासोतल्या लहान मुलाशी खेळू लागतं. शिल्प करणं ही कुठल्यातरी असामान्य प्रतिभा लाभलेल्या कलाकाराकडून घडणारी गोष्ट नव्हे, तर हसतखेळत, सहजपणे कशापासूनही कुणीही करू शकेल अशी सहज गोष्ट वाटू लागते.

'Little skipping girl' दोरीवर खेळणारी छोटीशी मुलगी हे शिल्पही तसंच फारच गोड. दोन टोपल्या जोडून केलेलं तिचा ड्रेस व बॉडी - क्या बात है!

एक कबुतर - Dove - शांततेचं प्रतीक - पिकासो या जगभर वापरल्या जाणाऱ्या शांततेच्या प्रतीकाचा जन्मदाता - हा आणखी एक विरोधाभास.

एका अतिशय साध्या चित्रात माझा जीव फारच अडकला. एक छोटा मुलगा व मुलगी लिहीत किंवा चित्र काढत बसली





**मुलं चित्रं काढत असताना वाकून बघणारी आई**

आहेत आणि त्यांची आई मागे उभी राहून, त्यांच्यापुढे वाकून ते काय करत आहेत ते बघत आहे. अगदी मोजक्या रेघांत काढलेलं चित्र. सिम्बॉलिक. कुठेही वास्तववादी नाही. सपाट चित्र पण काय ताकद आहे त्या चित्रात. आईचा चेहरा फक्त रेषांनी – नाक, डोळेही तसेच, पण तिच्या त्या चोस्टरमध्ये ती जबरदस्त ताकदीनं तिचं मुलांमधलं गुंतणं आविष्कारित करते. माझा पाय पुढच्या चित्राकडे जातच नव्हता. एका खोलीत 'मेंढी घेतलेला माणूस' (The man with a lamb) हे शिल्प होतं. मला त्याच्या अचाट कामाविषयी माहिती नसतानासुद्धा तेव्हा मला त्या अचाट कामाची चुणूक त्यात दिसली होती. कारण खोलीच्या मध्यभागी ते मोठालं दोन मीटर उंचीचं शिल्प आणि खोलीभर चारही बाजूंनी त्या शिल्पाकरता केलेली सर्व बाजूंची, सर्व कोनांतली असंख्य रेखाटनं. शिल्प अप्रतिम. ओबडधोबडपणामुळे अधिकच बोलकं. मेंढी अगदी अगतिक, करुण वाटत होती. केवढी मेहनत, अचाट श्रम ते शिल्प करण्यामागे. म्हणजे जागेपणीचा प्रत्येक क्षण जर कामात घालवला तरच एवढी प्रचंड निर्मिती होऊ शकते.

पिकासोचं ओझं उतरायला, त्यानं निर्माण केलेलं वादळ शमायला मला काही दिवस जावे लागले.

'मुला-द्-रूज'बद्दल बरंच काही ऐकलं होतं. पॅरिसमधला 'Moulin du Rouge' हा सुप्रसिद्ध नाइट शो बघावा-न बघावा? कसे लोक असतील? 'अश्लील' प्रकारात मोडणारा आहे का? त्याचे तिकिटाचे पैसे बघून गोळा उठलेला पोटात. पण जाऊ दे, उत्सुकता तर आहे. परत कधी येणार? येणार पण नाही कदाचित. न बघितल्याची खंत व कसा असेल 'शो' ही उत्सुकता आयुष्यभर मनात बाळगण्यापेक्षा बघितलेला बरा. फार तर फार काय होईल, पैसे वाया गेले – फार काही चांगला नव्हता – असं वाटू शकेल. या व अशा रुळांवरून विचारांची-चर्चेची गाडी पुन्हा पुन्हा फिरवून आणल्यावर 'बघूया' या निष्कर्षापर्यंत आम्ही पोचलो. फोनवर बुकिंग होतं अशी एक जाहिरात पाहिली होती. त्याप्रमाणे बुकिंग केलं. रात्री उशिराचा शो घ्यावा लागला. कारण त्या आधीच्या शोचं तिकीट डोळे पांढरे करणारं महागडं होतं. त्यात जेवणही मिळणार होतं. न खाता येणाऱ्या, न आवडणाऱ्या जेवणासाठी एवढे पैसे द्यायचे? त्यापेक्षा नंतरचा शो घेऊ. त्यात फक्त शॅम्पेन देणार होते. असली कडू पेयं लोक का पितात या विचारांची मी असल्यानं मला काही शॅम्पेनमध्ये रस नव्हता. पण मिता निदान थोडंफार तरी ते वाया जाऊ देणार नव्हती.

शोधत शोधत रात्री आम्ही त्या भागात पोचलो. तिथे आपल्याइथल्या तीन-चार गल्ल्या व्यापतील एवढी लांबलचक लोकांची रांग होती. आम्ही ती पार करत रांगेच्या पुढे जाऊन गेटपर्यंत पोचलो. गेटवरच्या गणवेशधाऱ्याला 'आमचं बुकिंग आहे' असं थोडं तोऱ्यात सांगितलं. त्यानं तेवढ्याच तुच्छतेनं, हे सर्व रांगेतले लोक तुमच्यासारखे फोन बुकिंगवालेच आहेत असं सांगितलं. आम्ही पार करून आलेली रांग पुन्हा उलटी पार केली व रांगेत शेवटी उभ्या राहिलो. एवढ्या लोकांना आता जागा मिळेल का अशी धाकधूक वाटत होती. त्यातल्या त्या दुःखात सुखाची गोष्ट एवढीच होती, की आमच्या मागेही उभं राहणाऱ्या लोकांची रांग वाढत होती.

शेवटी एकदाचे आमच्या पुढचे सारे लोक त्या गेटच्या आत सामावले व मागाहून आम्ही दोघीही. आम्हाला एक कोपऱ्यातलं दोघींपुरतं टेबल दिलं होतं.

आता काय बघायला मिळणार या विचारानं आमचा चेहरा जरा गोरामोरा झाला असावा. आजुबाजूची मंडळी रुळलेली वाटली असल्या प्रकारांना. शँपेन सर्व्ह केली गेली. काही वेळातच प्रेक्षागृहात अंधार झाला.

त्यानंतर पुढचे दोन-तीन तास आम्ही एक अप्रतिम दृश्यानुभव घेतला! एकापुढे एक दृश्य उलगडत होतं. नृत्य-उत्कृष्ट, कोरिओग्राफी-अतिशय तालबद्ध, जोशपूर्ण आणि सुसूत्र हालचाली. ट्रान्समध्ये गेल्यासारखंच वाटत होतं. शम्मीकपूर वगैरेंच्या जमान्यात हेलन कसे सिनेमात नाचायच्या वेळी कपडे घालायची त्याची आठवण येत होती. असंख्य नर्तक व नर्तकी. डोक्यावर मुकुटासारखं काहीतरी व त्यातून लांबलचक लाल-गुलाबी उंच पिसांचा डोंगर. कंबरेलाही तसाच लांब पिसांचा पोशाख – मोराच्या किंवा लांडोराच्या पिसाऱ्यासारखा. पुरुषांचेही तसेच त्याच रंगांचे ऐटबाज कपडे. स्त्रिया सर्व टॉपलेस होत्या, पण गंमत म्हणजे त्यामुळे कुठेही अश्लील भाव निर्माण होत नव्हते. त्यांच्या हालचाली अतिशय ग्रेसपूर्ण होत्या. सर्वच मुली अतिशय बारीक होत्या. त्यांचा तो डौलदार पदन्यास आणि अजस्त्र शिरस्त्राण – हातातले ग्लोव्हज्, कमरेचा



**'मुला-द्-रूज' नाइट शोमधील नर्तकी**

पिसाऱ्यासारखा टोप - पायात तसेच लाल-गुलाबी मोजे - या सगळ्यात त्यांचं ते टॉपलेस असणं अजिबात डोळ्यांना खुपत नव्हतं. उलट ते अतिशय नैसर्गिक वाटत होतं. याउलट, टॉपलेस न राहता पण भडक कपडे घालून आपल्या सिनेमांमधल्या नट्या व त्यांच्यामागे तशीच कवायत करणाऱ्या अनेक 'एक्स्ट्रा' मुली नृत्य या नावाखाली ज्या बीभत्स हालचाली करतात, त्या कितीदातरी ओंगळवाण्या, किळसवाण्या आणि अश्लील वाटतात.

सर्व कुटुंबीयांबरोबर बसून (घरातल्या लहानमोठ्या) कित्येकदा तो नाच बघायला नको वाटतं. इथे तसं वाटत नव्हतं. कुठेही चाळवणाऱ्या हालचाली किंवा चेहऱ्यावरचे भाव नव्हते.

मध्येच लोकांमधून एक काचेचा पाणी असलेला सर्व बाजूंनी पारदर्शक टँक खालून वर उचलला गेला. त्यात दोन-तीन मोठाले अजगर होते. आता काय दिसणार म्हणून सगळे श्वास रोखून होते. वरून कुठूनतरी एक मुलगी आली. तिनं त्या टँकमध्ये उडी मारली आणि काही क्षणात ती त्या सापांच्या वेटोळ्यातून सराईतपणे पोहू लागली! सापांच्या वेटोळ्यातून सुळकन होणाऱ्या तिच्या हालचाली नजर खिळवून ठेवत होत्या.

लगेच नंतर वरून - सर्कशीत असतात तसे काही नर्तक अवतरले. बहुधा हुकनं छताला अडकवलेले असणार आणि तिथं वर आच्छादलेल्या आकाशात कवायती करू लागले.

रंग, आकार, तारुण्य, जोश, नृत्य, लखलखाट, सुसूत्रता, संगीत, वाद्य, सगळं तीन तास सुरू होतं. डोळे विस्फारलेल्या अवस्थेत ते तीन तास कसे गेले काही कळलंच नाही. दीपलेल्या डोळ्यांनी व दीपलेल्या मनानं आम्ही तिथून उठलो. हे सगळं उभं करण्यात किती गुंतले असतील - किती सराव करावा लागत असेल? अपरिमित कष्ट त्यात असणार सर्वांचेच! नाचणारे, नृत्य-दिग्दर्शक, संगीतवाले, लाइट - खाली-वर, सर्व ठिकाणी नृत्यांगनांना उचलणारी यंत्रं सांभाळणारे तंत्रज्ञ आणि काय काय कोण जाणे!

कलेचा असाही एक आविष्कार. परफॉर्मिंग आर्ट. पॅरिस आम्हाला अजून काय काय दाखवणार होतं कोण जाणे.

मोनालिसा बघण्यात वेळ घालवायचा नाही असं मी जसं ठरवलं होतं, तसंच आयफेल टॉवरही बघायचा नाही असंही ठरवलं होतं. मोनालिसाची भेट झालीच. भेटून छानही वाटलं पण आयफेल टॉवर न बघता पॅरिसमध्ये हिंडता येणं शक्यच नाही हे मला आधी माहिती नव्हतं. तो एवढा टॉवरिंग आहे की कुठेही जा - तो दिसतोच. नंतर कुणीतरी मजेत म्हटलेलं आठवलं, की ''पॅरिसमध्ये जर अशा ठिकाणी फ्लॅट बांधायचा/घर घ्यायचं असेल, की जिथून आयफेल टॉवर दिसत नाही तर तो खुद्द आयफेल टॉवरवरच बांधावा.'' मोनालिसाला बघून आनंद झाला तसा आयफेल टॉवर बघून झाला असं मात्र म्हणता येणार नाही.

एवढ्या मोठ्या जागतिक कीर्तीच्या कलानगरीत - जिथे रंग, चित्र, शिल्प, संगमरवर यांचा खजिना आहे. मोठी परंपरा आहे तिथे असा विचित्र - धातूमध्ये - कुठलीही कलादृष्टी नसलेला आकार कसा काय बनवला असेल याचं आश्चर्य वाटलं. पॅरिसमध्ये कुठेही जा कुठल्यातरी कोपऱ्यातून तो सतत दिसतच राहतो - हे अस्वस्थ करणारं होतं. कुणीतरी सतत आपल्याला न्याहाळत आहे, वॉचमनसारखं-पहारेकऱ्यासारखं, असं वाटत होतं.

आता त्यावर जाणं हे ओघानं आलंच. वरून सर्व बाजूंनी पॅरिसचं दर्शन झालं. टिपिकल टुरिस्ट चक्रात इच्छा नसताना सापडल्यासारखं वाटत होतं.

त्यातल्या त्यात जरा आवडलं म्हणजे रात्रीचं त्यावरचं लाइटिंग. संबंध निळ्या प्रकाशात न्हाऊन निघालेला आयफेल टॉवर व त्यावर चमचमणाऱ्या प्रकाशाच्या चांदण्या.

सीन नदीवरचा पूल क्रॉस केला. थोडी अजून पुढे पायपीट केली तर Musee de Orsay ची पाटी दिसली. कधी एकदा आत जाते असं झालं. खूप ऐकलं होतं या म्युझियमबद्दल. माझ्या सर्व आवडत्या कलाकारांची पेंटिंग्ज यात आहेत हे माहीत

होतं. लूव्रपेक्षा अतिशय वेगळी इमारत. बाहेरच उघड्यावर काळ्या रंगातले ब्रॉन्झचे सहा-सात भलेमोठे (Larger than life size) पुतळे. काळ्या रंगाचा तजेला काही औरच. मस्त दिसत होते. देवळातल्या देवाच्या मूर्तीभोवती प्रदक्षिणा घालतो तशा मी त्या सर्व मूर्तींभोवती प्रदक्षिणा घातल्या. त्या सर्वांगसुंदर होत्या. त्याच्या मागच्या रुक्ष, चौकोनी इमारतींच्या पार्श्वभूमीवर त्या फारच उठून दिसत होत्या. परत मनात प्रश्न - ह्या कोणी केल्या, कशा केल्या? कुठेतरी माहिती बघायला पाहिजे. तिथं काहीच लिहिलेलं नव्हतं.

आत शिरले. रेल्वेच्या प्लॅटफॉर्म-सारखी रचना. कारण आधी ते रेल्वेस्टेशनच होतं. मग जसजशी ट्रेनची लांबी वाढत गेली तसतसे ते प्लॅटफॉर्म छोटे पडू लागले. मग १९८६ मध्ये त्याचं म्युझियम केलं.

यात १८४८ ते १९१५ मधल्या फ्रेंच कलाकृती - पेंटिंग्ज व शिल्प आहेत. मधली रुळाची जागा शिल्पं ठेवायला वापरली आहे.

आत शिरल्यावर फारच गोंधळल्या-सारखं झालं. मध्ये बघावं तर एवढी छान शिल्पं - ब्राँझमधलीपण, संगमरवरीपण! कितीतरी वेळ ते नीट बघण्यात घालवता आला असता. थोडी आजुबाजूच्या खोल्यांतून डोकावले तर वेडच लागल्यासारखं वाटू लागलं. डोळे विस्फारून मी वेंधळ्यासारखी इकडेतिकडे बघत राहिले. कुठल्याही बाजूला बघितलं तरी पेंटिंग्जचा खजिना आणि सगळे माझे आवडते कलाकार. एकाहून एक सुंदर चित्र. लहानपणी शाळेत एक कविता होती - एका लहान मुलाला खेळण्यांच्या दुकानात घेऊन जातात. तेव्हा त्याची तशीच गोंधळल्यासारखी स्थिती होते. त्याला वाटतं-

''हे घेऊ का ते घेऊ. दुकान उचलूनि का नेऊ?''

कुठलं खेळणं त्यातलं निवडू की सगळं दुकानच उचलून घरी नेऊ? मला त्यातलं काही निवडायचं नव्हतं. घरीही न्यायचं नव्हतं. पण ते सर्व बघायला माझ्याकडे फक्त दोन डोळे व काही तास एवढंच होतं. मनावर ताबा




बाथटबच्या एका कोपऱ्याला हातावर डोकं रेलून बसलेली स्त्री

मिळवत उपलब्ध वेळेचा योग्य तसा उपयोग करून घ्यायचा होता.

पाटी दिसली 'Realism' - वास्तववाद. म्हणजे डोळ्यांना जसं दिसतं तसं चित्र काढायचं. त्यात रोजच्या जीवनातल्या घटनांना स्थान मिळालं. सामान्य माणसाच्या आयुष्यातल्या साध्याशा प्रसंगांना स्थान मिळालं. कलाकाराच्या मनातलं भावनिक आंदोलन, त्याचं वैयक्तिक मत! एकंदरीत चित्रात जी चळवळ सुरू असते ती समाजातही सुरू असते. चित्रातल्या घडामोडी किंवा चित्रकार स्वत:ला सामाजिक-राजकीय परिस्थितीपासून अलिप्त ठेवू शकत नाही. वास्तववादात निसर्गचित्र-टिपिकल युरोपमधली कुरणं, त्यात गायी, मेंढ्या, वर विस्तीर्ण आकाशामध्ये झाडांचा काही भाग, हॅट घातलेले मेंढपाळ. एकंदरीत बऱ्यात निसर्गचित्रात चित्राचा बराचसा भाग आकाशानं व्यापलेला दिसला. नुसत्या आकाशात किती रंग, आकार, भावना उमटू शकतात! Turner या ब्रिटिश चित्रकाराची चित्रं आठवली. त्यात चित्राचा तीनचतुर्थांश भाग तरी आकाशानं व्यापलेला असतो. ते आकाशही बोलकं असतं - कधी शांत, नुसतंच विस्तीर्ण. कधी लाल-जांभळं रंगलेलं, कधी आक्रस्ताळी-आक्रमक.

वास्तववादी व्यक्तिचित्रात मानवी शरीराचं चित्रण हा एक न संपणारा कालातीत विषय आहे. प्रबोधनकाळात शारीरिक सौंदर्याचं उदात्तीकरणच झालं. प्रबोधन-पर्वानंतरही चित्रकलेत nude (नग्न शरीर) हा विषय चित्रकारांना कायम भुरळ पाडत आला आहे. नग्न देहाचं चित्रण हे सर्व काळातील कलाकारांना आव्हान वाटत आलं आहे.

Alfred Stevens (बेल्जियमचा पेंटर) याचं 'बाथटब' या शीर्षकाचं अप्रतिम वास्तववादी चित्र पाहिलं.

बाथटबमधून वर आलेला स्त्रीचा खांदा व चेहरा. ती स्त्री बाथटबच्या एका कोपऱ्याला हातावर डोकं रेलून बसली आहे. मागची जुनाट भिंत, जुन्या 'त्या' काळातल्या बाथटबचा रंग व टेक्स्चर. त्यातली पाण्याची पातळी, स्त्रीच्या नाजूक बोटांत धरलेली गुलाबाची दोन फुलं, कोपऱ्यात नक्षीदार पितळी, हंसाच्या मानेच्या आकाराचा नळ, त्याची धातूची चमक, शेजारी सिरॅमिकची (चिनी माती) फरशी साबण ठेवण्यासाठी! खालच्या बाजूला एक अर्धवट उघडं पुस्तक. नजर ठरतच नव्हती. पुढची चित्रं बघायला पाय उचलेना.

वास्तववाद म्हटलं, की प्लेटो व ॲरिस्टॉटल यांची आठवण येते. प्लेटोच्या म्हणण्याप्रमाणे, कलाकृतीतून सौंदर्यच निर्माण झालं पाहिजे. श्रेष्ठ कलाकृती म्हणजे सौंदर्याची निर्मिती. पण ॲरिस्टॉटल म्हणतो, 'कुरूपतेच्या चित्रणातूनही आनंद मिळू शकतो. सौंदर्याच्या आग्रहापेक्षा आनंद जास्त महत्त्वाचा.'

Musee De Orsay हे म्युझियम त्याच्या impressionist कलाकारांच्या कलाकृतींच्या संग्रहाबद्दल प्रसिद्ध आहे.

Impressionism म्हणजे माझा अगदी वीक पॉईंट. सगळे आवडते कलाकार. Claude Monet, Pissarro, Alfred Sisley, Renoir वगैरे वगैरे आणि अर्थातच The great Van gaugh! दृक्प्रत्ययवाद किंवा impressionism ही एकोणिसाव्या शतकातली चळवळ. पारंपरिक ॲकेडेमिक शैलीला आव्हान. 'Impression Sunrise' या मोनेच्या चित्रावरून या चळवळीचं नाव पडलं. निसर्ग व आजुबाजूची परिस्थिती याची हुबेहूब नक्कल करण्यापेक्षा कलाकाराच्या मनात त्याबद्दल काय भाव निर्माण झाले ते महत्त्वाचं. यात रंग व प्रकाश यांचा खेळ महत्त्वाचा. आधीची चित्र गुळगुळीत, यांची चित्र म्हणजे छोटे-छोटे ब्रशचे फटकारे. रंग पॅलेटमध्ये मिसळायचे नाहीत. शुद्ध रंगाचे छोटे पॅचेस शेजारी शेजारी कागदावर किंवा कॅनव्हासवर दिले, की बघणाऱ्यांच्या डोळ्यांत त्यांचं मिश्रण आपोआप होतं. चित्राचं काम नैसर्गिक प्रकाशात करणं महत्त्वाचं वाटलं म्हणून प्रथमच चित्रकला स्टुडिओतून बाहेर गेली. आउटडोअर पेंटिंग्ज केली गेली.

एका दालनात डोकावले तर चक्क ' Luncheon on grass हिरवळीवरील भोजन' हे Edouard Manet याचं गाजलेलं चित्र टांगलेलं. डोळाभरून पाहून घेतलं. १८६२च्या आसपासच्या काळात या चित्रानं म्हणे सामाजिक खळबळ माजवली होती. दोन पूर्ण पोशाखात बसलेल्या सभ्य पुरुषांसोबत हिरवळीवर चक्क एक विवस्त्र स्त्री बसलेली दाखवली आहे. त्यापूर्वी पौराणिक व धार्मिक विषयातील चित्रांत नग्नता दाखवली गेली होती व ती समाजमान्यही होती. पण अशा उपवनातील प्रसंगात नग्न स्त्री दाखवणं म्हणजे उच्च अभिरुचीला विघातक समजलं गेलं होतं. कलाकाराचं स्वातंत्र्य या विषयात दिसतं. चित्र बघणाऱ्याच्या डोळ्यांत थेट बघणारी ही स्त्री अतिशय boldly दाखवली आहे.

चित्र बघताना हे सगळे विचार मनात गर्दी करत होते. Impressionism चं दालन दिसलं आणि मी बाहेरच थोडा वेळ थांबले. अमूल्य खजिन्याची पेटी सापडली आणि त्या पेटीचं झाकण उघडायची हिंमतच होऊ नये तसं काहीसं झालं. हळुहळू हिम्मत करून दार उघडलं.

व्हॅन गॉग, पिकासो, अल्फ्रेड सिसिली सगळे हळुहळू भेटत गेले. 'देगा'ची प्रसिद्ध चित्रं म्हणजे 'बॅले डान्सर'. पांढराशुभ्र घेरदार झगा घातलेल्या नाचणाऱ्या, नाचायला निघालेल्या, नाचून थकलेल्या, नाचाची प्रॅक्टिस करायला निघालेल्या स्त्रिया. त्यांची नजाकत, नाजूक पदन्यास, नृत्यातली लय आणि त्या घेरेदार पांढऱ्या फ्रॉक्सची गती - सगळं माझ्या ओळखीचं. जुन्या स्नेह्याची कुण्या लांबच्या देशात भेट व्हावी तसं. Bailey Dancers च्या चित्रात dancers बरोबरच तिथला Wooden floor एवढा छान रंगवला होता. त्याचा तो 'लाकडी' रंग - लाकडी फील - अप्रतिम. त्या फ्लोरिंगवरून वर जाणारा तो स्पायरल जिना - कदाचित त्या जोरदार नाचाच्या वेगाच्या पार्श्वभूमीवर ते still flooring व still जिना (स्तब्ध) जास्त लक्ष वेधून घेत होते, का कुणास ठाऊक!

Claude Monet (मोने) हा आर्टिस्ट तिथं भरभरून होता. म्हणजे भरभरून वाहत होता. एका चर्चचं चित्र काढलं होतं. म्हणजे एकाच चर्चचे चार कॅनव्हास होते. ते दिवसाच्या वेगवेगळ्या वेळेला काढलेले होते. त्यामुळे रंग व त्यावर पडणारा प्रकाश वेगवेगळा होता.

चित्रकारानं एकाच वेळी ते चारही कॅनव्हास सुरू केले होते. सकाळच्या वेळी तो पहिला कॅनव्हास रंगवायचा. दुपारी दुसरा, संध्याकाळी तिसरा व रात्री चौथा. त्यामुळे चार वेगवेगळ्या रंगांत वेगवेगळी चित्रं, पण एकाच चर्चची होती. पहिल्या कॅनव्हासवरचं चित्रं गुलाबी-निळ्या रंगातलं तर दिवसाचं शेवटचं चित्र करड्या-ब्राऊन रंगाचं. केवढा ध्यास!

व्हॅन गॉचा एक पूर्ण सेक्शन! मी स्वत:ला चिमटे काढून - मी व्हॅन गॉची ओरिजिनल चित्रं बघतेय हे खरं आहे ना एवढंच जाणणं बाकी होतं. त्याचं starry night, self portrait, church अशी पाच-सहा चित्रं तिथं होती. Starry Nightमधल्या चांदण्या म्हणजे लहान मुलाची निरागसता.

ही सगळी अनेक पुस्तकांतून, नेटवर अनेक वेळा पाहिलेली चित्रं होती. जवळजवळ सगळी ओळखीची. ओरिजिनल बघितली नव्हती एवढंच काय ते. पण मनात येत होतं, की या चित्रांची माझ्या मनात एक प्रतिमा आहे. त्या प्रतिमेशी मीही ओरिजिनल चित्रं पडताळून पाहत होते, की ती एकमेकांशी किती जुळताहेत. पण जर मला या चित्रांबद्दल अजिबात माहिती नसती, म्हणजे मी पूर्ण कोऱ्या मनाच्या पाटीनं ही चित्रं प्रथमच पाहिली असती तर माझी काय प्रतिक्रिया झाली असती? मला खूपच कुतूहल/उत्सुकता वाटली. पण आता कळायला काय मार्ग? माझ्या मनातल्या त्या चित्रांच्या प्रतिमा मी पुसून तर टाकू शकत नव्हते.

माझे काही स्नेही चित्रपट दिग्दर्शन/लेखन करतात. त्यामुळे बऱ्याचदा मी त्यांच्या स्क्रिप्ट वाचनाच्या वेळेस हजर असते. नंतर जेव्हा मी तो चित्रपट पाहते तेव्हा प्रत्येक वेळेस मला वाटतं, की आता या प्रसंगाच्या पुढे काय घडणार आहे ते मला माहिती आहे. त्याविषयी सर्व चर्चा आधी झाली आहे. लेखक-दिग्दर्शकानं हा प्रसंग असा का घेतला? त्याला यातून काय सांगायचं आहे? त्याची भूमिका काय आहे? हे सर्व मला माहिती आहे. पण मला यातलं काहीच माहिती नसतं; कोऱ्या पाटीनं मी सिनेमा बघायला गेले असते तर मला तो चित्रपट कसा वाटला असता? ती संधी आता मी गमावली आहे. तसंच या चित्रांबाबतही झालं.

गोगाची बरीच चित्रं एका दालनात होती. हा कलंदर माणूस बराच काळ शेअर ब्रोकरच्या धंद्यात गुंतलेला! त्यानंतर तो पेंटिंगकडे वळला. ताहिती बेटावर जाऊन राहिला आणि तिथल्या आदिवासींची वेगवेगळ्या postures मध्ये स्केचेस, पेंटिंग्ज केली. यात त्याच्या रेषा व रंग दोन्हीही बोल्ड हेत. गोऱ्या-गुलाबी-कमनीय युरोपीय स्त्रियांच्या तुलनेत या स्त्रिया काळ्या-जाड

आहेत. भडक लाल, यलो ऑकर अशा रंगांच्या शेड्स आहेत. एका चित्रात एक स्त्री पाठमोरी बसली आहे. जमिनीला हात टेकून. तिचा तो टेकलेला हात एवढा विलक्षण आहे! त्यात तिच्या शरीराचा सगळा भार त्या हातावर आहे असं तो हात बघून स्पष्ट कळतं.

चित्रकलेचं वेड एवढं झपाटून टाकू शकतं, की आपला सुरळीत चाललेला संसार सोडून कुणी अचानक घरदार सारं सोडून त्यात स्वत:ला पूर्ण झोकून देऊ शकतं? ही सगळी जिनियस लोकं – थोडी थोडी वेडीच असावीत. शहाणी माणसं असंकाही करत नाहीत. जिनियसच्या हातूनच निर्मिती होते.

यलो क्राइस हे गोगाचं जगप्रसिद्ध चित्र. त्यांच्या चित्रात तो बहुतांश ठिकाणी pure colours शुद्ध रंग वापरतो. काळ्या जाड आउटलाइन आकृतींना आहेत. Perspective, Derspectived शेडींग ह्या दोन्हीकडे गोगाच्या चित्रात दुर्लक्ष आहे असं दिसतं.

पाय व डोळे जडावले तेव्हा तृप्त मनानं मी स्वत:ला मिटून घेतलं. माझी सगळी receptors मी आता बंद करून टाकली होती. तसंही म्युझियम बंद व्हायची वेळ झाली होती. बाहेर निघावंच लागणार होतं. म्युझियममधून बाहेर पडलो. समोरच सीन नदी होती. तिच्या किनाऱ्यावर आम्ही दोघी पायी फिरायला लागलो. आमच्यात काहीही संभाषण नव्हतं.

नोत्रदाम विषयी न बोलता पॅरिसचा विषय संपवायचा हे जरा कठीण आहे. नोत्रदाम (म्हणजे lady of paris) पॅरिसचं जगप्रसिद्ध कॅथलिक चर्च. फारशी त्यात शिल्पकला वा पेंटिंग्ज नसल्यानं मला फार रस नव्हता, पण आयफेल टॉवर बघू नये असं जेवढ्या तीव्रतेनं वाटत होतं तेवढं काही याबद्दल वाटत नव्हतं.

पेंटिंगमध्ये 'चित्राचा बॅलन्स' असा एक कन्सेप्ट असतो. आता वाटतं, की पॅरिसमध्ये एवढी सुंदर कला भरभरून आहे. त्या सुंदर कलेला बॅलन्स करायला, anchor करायला अशी आयफेल टॉवरसारखी मोठी, धातूची, कलाविरहित वास्तू केली असावी?

नोत्रदामचा बाहेरून रंग पॅरिसमधल्या सगळ्या इमारतींचा असतो तसा लाइट ग्रे होता. पॅरिस एवढी कलानगरी पण इमारतींचा रंग एकसारखाच का? ग्रे नाहीतर लाइट यलो ऑकर शेड. कलाकाराचं स्वातंत्र्य कुठे गेलं? मध्येच एखाद्याला आपली इमारत कोबाल्ट ब्लू रंगाने रंगवावीशी वाटली तर? शहरातले सगळे रंग गॅलऱ्यांमध्ये संपवून टाकले की काय! त्याच्या प्रवेशद्वारावरच असंख्य मानवांची–धर्मगुरूंची–राजांची शिल्पं कोरलेली आहेत. तिथल्या खिडक्यांचे रंगीत काचकाम म्हणजे नोत्रदामचा USP (Unique selling point). रंगीबेरंगी, प्रकाशमान काचेची तावदानं कॅलिडोस्कोपची आठवण करून देत होती.

त्या धावपळीत रोदाँचं म्युझियम बघायला फारच कमी वेळ उरला होता. तरीही जेवढं जमेल तेवढं बघायचं असं ठरवलं. सीटी टुरच्या त्या ओपन बसनं तिथं पोचलो. तिथं आम्हाला काहीतरी प्रश्न विचारला. नीटसं न कळल्यानं मी काहीतरी पुटपुटले. त्यावर आम्हा दोघींना दोन orange sticker देण्यात आली. बागेमध्ये शिल्प मांडलेली होती. फ्रान्सचा त्या काळातला तो सर्वांत महत्त्वाचा शिल्पकार. नव्या शिल्पकलेचा जनक.

बागेत शिरलो. झाडांच्या मधे मधे शिल्प मांडलेली. उघड्यावरच बरीचशी होती आणि काही काचांमधून बंदिस्त केलेली. संगमरवरी तशीच ब्रॉन्झचीही. 'The gates of Hell' आणि 'The Thinker' ही त्याची जगप्रसिद्ध शिल्पं. 'The Thinker' च्या बऱ्याच कॉपीज् आहेत. बागेत एक भलामोठा 'Thinker' हातावर हनुवटी टेकवून, पुढे वाकून बसलेला दिसला. त्याचे स्नायू मायकेलअँजेलोची आठवण करून देत होते.

'Thinker'ला आधी 'The Poet' हे नाव होतं. बुद्धिमत्ता व काव्य ह्या दोन्हीचा संगम या कलाकृतीत दिसतो. तत्त्वज्ञानी असावा असं वाटतं. त्याच्या शिल्पावर असलेला मायकेलअँजेलोचा प्रभाव स्वत: रोदाँनं आभारपूर्वक मान्य केला आहे.

'The gates of Hell' या शिल्पावर रोदाँनं बरीच वर्षं काम केलं. त्यातल्याच काही शिल्पाकृतींना स्वतंत्र शिल्प म्हणून मान्यता मिळाली. 'The Thinker' व 'The Kiss' ही त्यातलीच. 'The Kiss' मध्ये पुरुष व स्त्री चुंबनाच्या आर्विभावात आहेत. फारच अप्रतिम शिल्प आहे. कुणा पूर्ततेस न जाऊ शकलेल्या प्रेमीयुगुलाची ती कहाणी आहे. त्यांच्या ओठांत अंतर ठेवून रोदाँनं ते असफल प्रेम आहे असं सूचित केलं आहे. आणखी एक शिल्प– 'Walking man'. दोन्ही पाय पूर्ण जमिनीला टेकले आहेत पण तरीही त्यात चालण्याचा आभास आहे. चालताना दोन्ही पाय टेकलेले कसे असू शकतील? एक पाय उचललेला हवा. पण तीच त्यातली गंमत आहे. काही ठिकाणी नुसत्याच चालत्या पायांचं शिल्प आहे.

बागेत फिरून शिल्प बघून झाली. 'बघून झाली' – असं म्हणणं किती धाडसाचं आहे! तर बघून झाल्यावर आम्ही वरच्या मजल्याकडे वळलो. आता वेळ नाही, जास्त वेळ घेतला तर पुढची ट्रेन चुकेल असं मिता मला एकीकडे सांगतच होती. वरच्या मजल्यावरच्या दरवानानं आम्हाला अडवलं व आमची ती orange stickers आम्हाला दाखवली. तर मघाशी तो न कळलेला प्रश्न हा असावा. वर जाणारे सगळे पिवळेवाले होते. वेळ नव्हताच, त्यामुळे झालं ते ठीकच होतं. पण तरी खूप भूक लागली असताना – भरलं ताट पुढे यावं आणि अचानक कुणीतरी ताटातलं अर्धं अन्न काढून घ्यावं तसं काहीसं झालं. अर्धं अन्न तर मिळालं होतं. मनात रुखरुख ठेवून आम्ही पाय वळवले.

पॅरिसनं आम्हाला काय काय दाखवलं होतं! सगळ्या शिदोऱ्या गच्च भरल्या होत्या.

कलानगरीच्या वाटचालीमधला पॅरिसचा आमचा मुक्काम संपला. वाटचाल मात्र सुरूच होती.

**– डॉ. माधवी मेहेंदळे**
प्रकाश डोळ्यांचे हॉस्पिटल,
डेक्कन जिमखाना, पुणे
भ्रमणध्वनी : ९८९०९०४१२३
madhavimehendale@gmail.com

## जानेवारी २०११ ते जून २०१२ या काळात प्रसिद्ध झालेली ग्रंथाली प्रकाशने

१. **शांताराम व्यक्ती आणि वाङ्मय**
सुरेखा सबनीस
मूल्य २५० रु.

२. **दिवस असे की...**
प्रवीण बर्दापूरकर
मूल्य २२५ रु.

३. **नोंदी डायरीनंतरच्या**
प्रवीण बर्दापूरकर
मूल्य २०० रु.

४. **टिळक ते गांधी मार्गे खाडिलकर**
मुकुंद वझे
मूल्य १२० रु.

५. **मराठी भाषेतील असभ्य म्हणी आणि वाक्प्रचार**
अ.द. मराठे
मूल्य २५० रु.

६. **ओंजळ काव्यफुलांची**
सुभाषचंद्र मयेकर
मूल्य १२५ रु.

७. **अहिराणी लोकपरंपरा**
डॉ. सुधीर देवरे
मूल्य १५० रु.

८. **प्रिय आयुष्यास सप्रेम नमस्कार**
संगीता धायगुडे
मूल्य ८० रु.

९. **आठवणींची साठवण**
डॉ. सुरेश नाडकर्णी
मूल्य १८० रु.

१०. **माझ्या मनाचा मुरांबा**
वसुमती धुरू
मूल्य २७५ रु.

११. **संवादने**
विद्या हर्डीकर-सप्रे
मूल्य १५० रु.

१२. **परक्या भूमीवर घर**
स्मिता भागवत
मूल्य १५० रु.

१३. **तेजस्विनी**
स्मिता भागवत
मूल्य १५० रु.

१४. **मनातल्या वावटळी**
प्रगती कोळगे
मूल्य १०० रु.

१५. **आकार**
सदाशिव साठे
मूल्य २५० रु.

१६. **तमाशा : विठाबाईच्या आयुष्याचा**
योगीराज बागूल
मूल्य २५० रु.

१७. **आचंद्र-सूर्य नांदो**
अनुराधा गोरे
मूल्य १६० रु.

१८. **गाऊ त्यांना आरती**
अनुराधा गोरे
मूल्य ३०० रु.

१९. **बाळाची चाहूल**
अनुराधा गांगल
मूल्य ६० रु.

२०. **भारती सृष्टीचे**
अनुराधा गांगल
मूल्य १२० रु.

२१. **संस्कार**
अनुराधा गांगल
मूल्य ६० रु.

२२. **रांगोळी**
अनुराधा गांगल
मूल्य १८० रु.

२३. **महाराष्ट्राची सुवर्णगाथा**
वसंत देशपांडे
मूल्य १८० रु.

२४. **मी विंदा बोलतेय**
जयमाला देसाई
मूल्य १२० रु.

२५. **शांबरिका खरोलिका**
श्रीकांत पेटकर
मूल्य ६० रु.

२६. **प्रेरक संघर्षाचा अमृतमयी ठेवा**
बाबासाहेब पाटील
मूल्य १८० रु.

२७. **आनंदाकार**
प्रकाश पेठे
मूल्य १०० रु.

२८. **हवा, पानी और...**
भारत गजेंद्रगडकर
मूल्य ७५ रु.

२९. **एका पत्रकाराची दुनिया**
भारत गजेंद्रगडकर
मूल्य १५० रु.

३०. **भयशून्य चित्त जेथ...**
अनुवाद व संपादन डॉ. नरेंद्र जाधव
मूल्य ३०० रु.

३१. **आठवणींच्या जगात : जर्मनीतील तीन तपांचा अनुभव**
निरुपमा सोनाळकर
मूल्य ३०० रु.

३२. **ईश्वरविरहित जीवन (खंड १)**
शरद बेडेकर
मूल्य १८० रु.

३३. **ईश्वरविरहित जीवन (खंड २)**
शरद बेडेकर
मूल्य २०० रु.

३४. **नोबेलनगरीतील नवलस्वप्ने-२०११**
सुधीर-नंदिनी थत्ते
मूल्य ८० रु.

३५. **अस्फुट आवाजांचा प्रदेश**
डॉ. जयश्री गोडसे
मूल्य १८० रु.

३६. **अजब सहवास**
गो.आ. भट
मूल्य १०० रु.

३७. **सव्वाशे बोधकथा**
दिलीप पांढरपट्टे
मूल्य १२० रु.

३८. **यशवंतराव चव्हाण : माणूस आणि लेखक**
डॉ. प्रकाश दुकळे
मूल्य २५० रु.

३९. **१९७१चा रणसंग्राम**
अनुराधा गोरे
मूल्य ३५० रु.

४०. **वेचक व्हिएतनामी लोककथा**
प्रभा पुरोहित
मूल्य ७५ रु.

४१. **कथा जगप्रसिद्ध पुलांच्या**
सुधीर कुलकर्णी
मूल्य ३५० रु.

४२. **विचारवंतांचा विवेकविशेष**
शरद बेडेकर
मूल्य १०० रु.

४३. **उंबरठ्यावरचे दिवस**
भाऊ गावंडे
मूल्य ५०० रु.

४४. **वर्तुळ पुसून टाकताना...**
शारदा नवले
मूल्य ८० रु.

४५. **ओळखीची वाट**
नीला सत्यनारायण
मूल्य १५० रु.

४६. **आठवा चिरंजीव**
डॉ. प्रतिभा मुडगेरीकर
मूल्य १५० रु.

४७. **वडोदरा**
प्रकाश पेठे
मूल्य ८० रु.

४८. **दीपस्तंभ**
दीपक घारे/रंजन र. जोशी
मूल्य ३५० रु.

४९. **आधुनिक युगातील विचारसरणी**
डॉ. विजय जोशी/जयश्री जोशी
मूल्य १०० रु.

५०. **कवडसे**
महेश केळुस्कर
मूल्य ७० रु.

५१. **दु:ख माझे कोवळे**
प्रतिभा सराफ
६० रु.

५२. **साहित्य : आस्वाद आणि अनुभव**
डॉ. द.ता. भोसले
२०० रु.

५३. **मनस्वी** – बाबूराव चंदावार
५०० रु.

५४. **मनोमनी** – जयश्री भिसे
७५ रु.

५५. **झुंज आणि झेप**
गो.मा. वाघमारे (गुरुजी)
१०० रु.

५६. **जैन हिल्सवरील जागरण**
भवरलाल जैन
१२० रु.

५७. **आठवणीतील पाऊले**
डॉ. मो.शि. तथा बापुसाहेब रेगे
३०० रु.

५८. **अखेर न्याय मिळाला**
नीलिमा कानेटकर
मूल्य ३५० रु.


५९. **नाझी नरसंहार**
कुमार नवाथे
मूल्य १५० रु.

६०. **डायरी**
प्रवीण बर्दापूरकर
मूल्य १८० रु.

**एकूण ६० पुस्तकांचा संच मूळ किंमत १०७५० रु. • सवलतीत ५३०० रुपयांत**
**सुटी पुस्तके घेतल्यास ३०% सवलतीत**

॥ग्रंथाली॥


अनुराधा गांगल यांच्या पारदर्शी शैलीतून उतरलेली, निसर्ग आणि मानव यांच्या नात्याची पारंपरिक वीण, त्यातून आलेला सांस्कृतिक ठेवा जपणारी आणि बदलत्या काळाची चाहूल घेत मनुष्य स्वभावाचे पदर उलगडणारी चार पुस्तकं...




## भारती सृष्टीचे

अनुराधा गांगल

मूल्य १२० रु.
सवलतीत ७० रु.




## संस्कार

अनुराधा गांगल

मूल्य ६० रु.
सवलतीत ३५ रु.




## बाळाची चाहूल

अनुराधा गांगल

मूल्य ६० रु.
सवलतीत ३५ रु.





## रांगोळी

अनुराधा गांगल

मूल्य १८० रु.
सवलतीत ११० रु.


वीरमाता अनुराधा गोरे कथित सैनिकीजीवन, स्वातंत्र्योत्तर युद्धप्रसंग आणि त्यात कर्तबगारी बजावलेल्या वीरांच्या कहाण्या...




## आचंद्र-सूर्य नांदो...

अनुराधा गोरे


मूल्य १६० रु.  सवलतीत १०० रु.




## गाऊ त्यांना आरती

अनुराधा गोरे

मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.




## १९७१चा रणसंग्राम


अनुराधा गोरे

मूल्य ३५० रु.  सवलतीत २१० रु.

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011

RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

# यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीनिमित्त आयोजित ग्रंथयात्रेतील क्षणचित्रे



औरंगाबाद प्रदर्शनाला शिक्षणमंत्री राजेंद दर्डा यांची भेट



पैठण



अंबड



जालना



गेवराई



बीड

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली' करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा वुलन मिल म्युनि. स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.